सुविचार

यदि मन में दृढ निश्चय व विश्वास है तो विजय निश्चित है । अगर संकल्प कमजोर हैं तो पराजय होगी ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ गुरुवार दि. १८ जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५३ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पंढरपुरात विठ्ठलाची शासकीय महापूजा संपन्न



मुंबई: राज्यात आषाढी एकादशीचा मोठा सोहळा सर्वत्र साजरा केला जात आहे. आषाढी एकादशीनिमित्त आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्नीक पहाटे विठ्ठलाची महापुजा संपन्न झाली आहे. पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास ही शासकीय महापूजा संपन्न झाली. यावेळी राज्यात भरपूर पाऊसपाणी पडू दे, माझा शेतकरी राजा सुखी-समाधानी राहो असं साकडंही यावेळी मुख्यमंत्र्यांनी विठ्ठलाच्या चरणी घातले.

मुख्यमंत्र्यांसह आणखी एका जोडप्याला या पुजेला बसण्याचा मान मिळतो. यावेळी हा मान नाशिक जिल्ह्यातील बाळू शंकर अहिरे आणि त्यांची पत्नी आशा अहिरे यांना मिळाला.

पंढरपुरात आषाढी एकादशीनिमित्त भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. या सोहळ्यासाठी तब्बल पंधरा लाखाहून अधिक भाविक पुंडलिक नगरीत दाखल झाले आहेत. आपल्या लाडक्या विठुरायाला याचि देही याचि डोळा पाहण्यासाठी भक्त आसुसलेले असतात. गेल्या अनेक दिवसांपासून चालत आपल्या पांडुरंगाला भेटण्यासाठी वारकरीही पंढरपुरात दाखल झाले आहेत.

दरम्यान, यावेळी मुख्यमंत्र्यांसह राज्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत, कामगार मंत्री सुरेश खाडे, मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षणमंत्री दीपक केसरकर हे उपस्थित होते.

## थोडक्यात बचावले अजित पवार व फडणवीस

### पायलटच्या कौशल्यामुळे हेलिकॉप्टर दुर्घटना टळली

मुंबई : प्रतिनिधी- राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार त्यांच्यासोबत उद्योग मंत्री उदय सामंत आणि पार्थ पवार नागपूर ते गडचिरोली हेलिकॉप्टर प्रवासात सुदैवाने बचावले आहेत. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर पावसाळी ढगात भरकटले होते. खराब हवामानामुळे दृष्यमानता अत्यंत कमी झाली होती. हेलिकॉप्टर पायलटने मोठ्या कौशल्याने हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवले. त्यामुळे पुढील मोठी दुर्घटना टळली.

चार महत्त्वाचे नेते या हेलिकॉप्टरमध्ये होते. त्यावेळी हेलिकॉप्टर भरकटले होते. गडचिरोलीत खराब हवामानाचा फटका त्यांना बसला होता. पण, सुदैवाने सर्वजण सुखरूप आहेत. हेलिकॉप्टर पायलटने यावेळी आपले कौशल्य दाखवल्याचे सांगितले जाते. त्याने सुखरूप हेलिकॉप्टर जमिनीवर



उतरवले, असे वृत्तात सांगण्यात आले आहे.


अजित पवारांनीच हा किस्सा आज सांगितला आहे. हेलिकॉप्टर व्यवस्थित उडाले पण ते नंतर भरकटले. हेलिकॉप्टर ढगात गेले होते. पण, देवेंद्र फडणवीस निवांत गप्पा मारत होते, असे अजित पवार म्हणाले. सुदैवाने पायलटने कौशल्य दाखवत हेलिकॉप्टर जमिनीवर उतरवले. त्यानंतर दोन्ही उपमुख्ममंत्र्यांनी गडचिरोलीच्या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

अजित पवार म्हणाले की, सुरुवातीला बरे वाटले, पण इकडे ढग, तिकडे ढग दिसत होते. मी फडणवीसांना म्हटले जरा बाहेर बघा. पण, ते म्हणाले काही काळजी करू नका. आतापर्यंत माझे सहा असे अपघात झाले आहेत. अशा अपघातामध्ये मला काही झालेलं नाही. त्यामुळे तुम्हाला देखील काही होणार नाही. तुम्ही निवांत राहा.

मी काळजीत पडतो होतो. पण, फडणवीस निवांत होते. मागची पुण्याई असेल. त्यामुळेच ते इथपर्यंत पोहोचले आहेत. उदय सामंत देखील आमच्यासोबत होते. ते म्हणाले, दादा जमीन दिसायला लागली, तेव्हा कुठे माझा जीव भांड्यात पडला, असे अजित पवार म्हणाले. अजित पवार कार्यक्रमात बोलताना हा किस्सा सांगत होते.

## ओमानच्या किनाऱ्यावर बुडालेल्या जहाजातील १३ भारतीयांसह १६ क्रू मेंबर्स बेपत्ता

नवी दिल्ली : ओमानमधून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. ओमानमधून येमेनच्या दिशेने जाणारे तेलवाहू जहाज बुडाल्याची माहिती मिळत आहे. यामध्ये १३ भारतीय व ३ श्रीलंकेचे नागरिक होते. मात्र या अपघातात सर्वजण बेपत्ता झाले असून अद्यापही या १६ क्रू मेंबर्सबाबत कोणतीही माहिती हाती लागली नाही.



मिळालेल्या माहितीनुसार, या तेलाच्या टँकरचं नाव प्रेस्टीज फाल्कन आहे. सोमवारी १५ जुलै रोजी ही जहाज बुडाल्याची घटना घडली असून तेव्हापासून सर्व कर्मचारी बेपत्ता आहेत. ओमानच्या सागरी सुरक्षा केंद्राने मंगळवारी १६ जुलै रोजी याबाबतची माहिती दिली. सुरक्षा केंद्राने सांगितले की, प्रेस्टीज फाल्कन नावाचे तेलवाहू जहाज दुबईच्या बंदरावरून निघाले होते. ओमानमधील येमेन ऐडन बंदराकडे येत असताना हा अपघात घडला.

दरम्यान, जहाजावरील बेपत्ता झालेले सर्व कर्मचाऱ्यांचा शोध घेण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. मात्र दोन दिवस उलटूनही अद्याप कोणत्याही कर्मचाऱ्याचा शोध लागला नसून सर्वत्र खळबळ उडाली आहे.

ओमानच्या दक्षिण-पश्चिम किनारपट्टीवर स्थित असणारा ड्यूकम बंदर शहराजवळ रास मदारकाच्या आग्नेय-पूर्वेला २५ नॉटिकल मैलांवर बुडाले. हे तेलवाहू जहाज पाण्यात बुडाले असून पलटी झाले होते. दरम्यान, जहाज पुन्हा स्थिर झाले की नाही तसेच जहाज (पान २ वर)

## शिष्यवृत्ती परीक्षेत २१४ शाळांना भोपळा

पुणे : राज्य सरकारकडून इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची परीक्षा घेण्यात येते. नुकत्याच पाचवीच्या स्कॉलरशिप परीक्षांचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत २००हून अधिक शाळांना भोपळा मिळाला आहे. यामुळे संतापलेला शिक्षण विभाग ॲक्शन मोडवर आला असून शिक्षकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, इयत्ता पाचवीच्या वर्गातील मुला मुलींसाठी शिष्यवृत्तीची परीक्षा घेण्यात आलेल्या परीक्षेत पुणे जिल्हा परिषदेच्या तब्बल २१४ शाळांचा निकाल शून्य टक्के लागला आहे. या निकालाबाबत शिक्षण विभागात तीव्र संताप पसरला असून संबंधित शिक्षकांविरोधात गंभीर दखल घेतल्याचे समोर आले आहे.

राज्य सरकारकडून घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या परीक्षेसाठी तयार करणे आणि त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्याची जबाबदारी ही शिक्षकांची असते. मात्र शिक्षकांनी विद्यार्थ्यांना याबाबत शिकवलेच नाही. त्यामुळे याप्रकरणी शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच समाधानकारक खुलासा न मिळाल्यास संबंधितांची एक वेतनवाढ रोखण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शिक्षकांवर कारवाईचा बडगा

पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३ हजार ६२१ इतक्या शाळा आहेत. त्यापैकी पाचवी इयत्तेच्या ९३२ शाळा आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत सहभागी होणे गरजेचे होते. परंतु जिल्ह्यातील १०९ शाळांनी शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज भरले नसल्याचे समोर आले. त्यामुळे पुणे विभागात मोठ्या प्रमाणात शाळांचा शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल शून्य टक्के लागला आहे. या कारणामुळे शिक्षण विभागाने संबंधित शाळेच्या शिक्षकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

## लंडनमधील वाघनखांचे उद्या महाराष्ट्रात आगमन होणार

मुंबई : महाराष्ट्रातील शिवप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. काही दिवसांपूर्वी लंडन येथील असलेली बहुप्रतिक्षित वाघनखांबाबत चर्चेचे उधाण पसरले होते. विरोधकांकडून ही वाघनखे शिवरायांची नसल्याचा आरोप केला जात होता. त्यावर सुधीर मुनगंटीवार यांनी ही वाघनखे शिवरायांचीच असल्याचा दावा केला होता. त्यानंतर ही वाघनखे लवकरच महाराष्ट्रात येतील अशी घोषणाही त्यांनी केली होती. दरम्यान आता लवकरच लंडनमधील वाघनखांचे महाराष्ट्रात आगमन होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती शिवाजी महाराज यांची लंडनमधील व्हिक्टोरीया अँड अल्बर्ड म्युझियमध्ये खासगी सुरक्षेत ठेवलेली वाघनखे उद्या महाराष्ट्रात आणली जाणार आहेत. त्यानंतर सायंकाळी ती सातारा येथे नेली जाणार आहेत. विशेष विमानातून वाघनखे साताऱ्यात दाखल होणार असून राज्य सरकारच्या वतीने १९ जुलै रोजी या वाघनखांबाबत साताऱ्यात भव्यदिव्य सोहळ्याचे आयोजन देखील करण्यात आले आहे.

वाघनखे ठेवण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च

महाराष्ट्रात आणल्या जाणाऱ्या वाघनखांसोबत छत्रपती शिवरायांच्या इतर शस्त्रांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. त्यामुळे साताऱ्यामधील म्युझियमच्या डागडुजीसाठी आणि नुतनीकरणासाठी १४ लाख ८ हजार रुपयांचा खर्च झाला करण्यात आला आहे.

## उद्धव ठाकरेंनी शरद पवारांनाहि फसवले शरद पवार यांनीच केला खुलासा

पुणे : विधान परिषदेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे हे दिलेल्या शब्दाला जागले नाहीत. विधान परिषदेच्या निवडणुकीत ऐनवेळी उमेदवार उभा केल्याने महाविकास आघाडीच्या जयंत पाटलांचा पराभव झाल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

जयंत पाटलांना विधान परिषदेत उमेदवारी दिली असताना उद्धव ठाकरेंनी उमेदवार दिला. निवडणुकीत आमचा उमेदवार नव्हता, तर जयंत पाटलांना आमची मते देऊ असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले होते. दुसऱ्या क्रमांकाच्या मतांवरून सुद्धा आम्ही चर्चा केली होती. परंतु ऐनवेळी उमेदवार उभा केल्याने



आमच्या उमेदवाराचा पराभव झाला, असे पवार म्हणाले.

आज पुण्यामध्ये पुणे श्रमिक पत्रकार संघाकडून आयोजित करणाऱ्या वार्तालापमध्ये शरद पवार यांनी विविध प्रश्नांवर दिलखुलास उत्तरे दिली. त्याचबरोबर जोरदार राजकीय फटकेबाजी सुद्धा केली. लोकसभा निवडणुकीत जास्त जागा घेऊन जास्त उमेदवार निवडून आणण्यात यश आले नाही. विधान परिषदेला सुद्धा उमेदवार दिला. त्यामुळे महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे हट्ट करतात का? असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. यावेळी शरद पवार यांनी उत्तर दिले. शरद पवार म्हणाले, थोडा स्वभाव असतो एखाद्याचा. कोणत्याही राजकीय पक्षाचा नेता आपल्या पक्षाच्या हिताच्या दृष्टीने आग्रही भूमिका घेत असतो पण थोडे अडजेस्ट करावे लागते. लोकांसमोर सामूहिकपणे जात असताना तडजोड करायच्या असतात. मात्र, त्यांच्या स्वभावाला काय करणार? परंतु त्यामुळे आम्ही अस्वस्थ होत नाही.

त्यामुळे मविआमध्ये नेतृत्वावरून संघर्ष आहे का, असे विचारण्यात आले असता शरद पवारांनी अजिबात संघर्ष नसल्याचे सांगितले.

## अखेर नवी मुंबईच्या धावपट्टीवरुन उडाले विमान

नवी मुंबई : राज्यातील बहूचर्चित नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून विमान उडताना आणि उतरताना कोणता अडथळा तर येत



नाही ना, हे पाहण्यासाठी बुधवारी पहिल्यांदाच भारतीय विमानतळ प्राधिकरणाने सिग्नलसह विमानांची चाचणी घेतली. भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे विशेष विमान नवी मुंबई विमानतळावरून उडणार असल्याचे समजताच परिसरात बघ्यांनी मोठी गर्दी केली होती. या चाचणीचा अहवाल मुख्यालयाला पाठविण्यात येणार आहे.

नवी मुंबई विमानतळ पाच टप्प्यांत उभारले जाणार आहे. टप्पा क्रमांक १ आणि २ एकत्रित पूर्ण केले जाणार आहे. यात एक टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत हा टप्पा व्यावसायिक वापरासाठी खुला होईल. याअंतर्गत दोन कोटी प्रवासी प्रवास करू शकतील, असा अंदाज आहे. तर टप्पा क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये तीन टर्मिनल आणि एक रन वे असणार आहे.

(पान २ वर)

## लाडकी बहीण नंतर आता मुख्यमंत्र्यांची लाडक्या भावांसाठी खास योजनेची घोषणा

सोलापूर : प्रतिनिधी- राज्य सरकारने नुकतीच राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरू केली असून या योजनेद्वारे पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या भावांसाठीही खास योजनेची घोषणा केली आहे.

जो तरुण बारावी उत्तीर्ण झाला असेल, त्याला दरमहा सहा हजार रुपये दिले जातील. तर डिप्लोमा केलेल्या तरुणाला आठ हजार रुपये मिळतील. तसेच पदवीधर तरुणाला १० हजार रुपये महिन्याला दिले जातील, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते



आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. या महापूजेनंतर त्यांनी भाषण केले. या भाषणावेळी त्यांनी ही घोषणा केली.

हा तरुण वर्षभर एखाद्या कारखान्यात अप्रेन्टिसशिप करेल. त्यानंतर तिथे त्याला कामाचा अनुभव मिळेल आणि त्या अनुभवाच्या जोरावर त्याला नोकरी देखील मिळेल. एक प्रकारे आपण स्कील्ड मॅनपॉवर (कुशल कामगार) तयार करत आहोत. राज्यासह देशातील उद्योग जगताला कुशल तरुण पुरवणार आहोत. आपले तरुण त्यांच्या कामात कुशल व्हावेत, यासाठी सरकार पैसे भरणार आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला आता दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे महिलांना आता ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करता येणार आहे. तसेच ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना ०१ जुलै, २०२४ पासून दर महा रु. १५०० आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.



लातूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नारायण आबा लोखंडे यांचे वडील कै. लक्ष्मणराव लोखंडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यानिमित्ताने आज उजनी तालुका औसा येथे महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली व सांत्वन केले. यावेळी सोसायटीचे चेअरमन अरुण मुकडे, रौफ शेरीकर, भागवत जाजू शेठजी, प्रवीण कोपरकर, शिवराज मुकडे, गिरीराज सोमानी, गोविंद गंगणे तसेच लोखंडे कुटुंबीयातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींना रक्षाबंधनालाच मिळणार ३ हजार

नागपूर : प्रतिनिधी – अर्थमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री लाडकी



बहीण योजनेचे पैसे महिलांच्या खात्यात रक्षाबंधनाच्या दिवशी जमा होणार आहेत. जुलै आणि ऑगस्ट महिन्याची रक्कम रक्षाबंधनाला लाभार्थी महिलांना मिळणार आहे. राज्य सरकारकडून महिलांना राखीची भेट दिली जाणार आहे.

दरम्यान, महाराष्ट्र सरकारकडून 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने'ची घोषणा करण्यात आली. या योजनेंतर्गत महिलांना दरमाहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. योजनेची घोषणा झाल्यापासूनच अर्ज करण्यासाठी महिलांची झुंबड उडाल्याची पाहायला मिळाले. अनेक महिलांची अर्जाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

आता या योजनेचे पैसे खात्यात कधी जमा होणार? याकडे सर्व महिलांचे लक्ष लागले आहे. याचसंदर्भात राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी मोठी घोषणा केली आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी महिलांच्या (पान २ वर)

## समाजवादी पक्ष महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढणार?

मुंबई : प्रतिनिधी- समाजवादी पक्षाने महाराष्ट्रात महाविकास आघाडीसोबत हातमिळवणी केली आहे. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाला पुरेसे प्रतिनिधित्व न मिळाल्यास महाराष्ट्रात आपण स्वबळावर लढू, असा इशारा पक्षाध्यक्ष अखिलेश यादव यांनी गेल्या आठवड्यात दिला आहे. त्यामुळे समाजवादी पक्ष महाराष्ट्रात स्वबळावर निवडणूक लढणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, उत्तर प्रदेशमध्ये विजयी झालेले सर्व नवनिर्वाचित ३७ खासदार आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आणि सत्कारासाठी मुंबईत येणार आहेत.

लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाचे ३७ उमेदवार विजयी झाले आहेत. यानंतर सपा प्रत्येक राज्यात आपली ताकद वाढवण्याच्या दृष्टीने काम करत आहे. १९ जुलैला वांद्रे रंग शारदा येथे सर्व खासदारांचा समाजवादी पक्ष महाराष्ट्राच्या वतीने सत्कार केला जाणार आहे. तर आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आणि मुंबई महानगरपालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रित करून मुंबईतील आपल्या व्होट बँकेला अधिक सक्षम करण्यासाठी समाजवादी पक्षाने या कार्यक्रमाचे आयोजन केल्याची चर्चा आहे.

सपा खासदारांच्या मुंबई दौ-यादरम्यान अखिलेश यादव यांच्यासह सर्व खासदार चैत्यभूमी, गांधी संग्रहालय आणि छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दादर येथे भेट देणार आहेत.

पुढच्या काही महिन्यांतच निवडणुका

दरम्यान, पुढच्या काही महिन्यांतच महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. अनेक राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी सुरू आहेत. त्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच आता समाजवादी पार्टी देखील विधानसभेची निवडणूक स्वबळावर लढवण्याची चर्चा सुरू झाली आहे.

# विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलची आषाढी एकादशीनिमित्त दिंडी




लातुर (प्रतिनिधी) : औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल, विश्वेश्वरपुरम्, लातूर स्कुलच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांची दिंडी मोठया उत्साहात काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रूक्मिणी व विविध संताच्या, वारकऐयांच्या वेषभुषेत, टाळ मृदंगाच्या गजरात तसेच ज्ञानोबा तुकारामाच्या नामघोषात वासनगाव गावात पायी दिंडी व पालखी मिरवणुक काढण्यात आली. या प्रसंगी विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलचे प्राचार्य अंकुश बिडवे, विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी योगेश धाराशिवे, विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, दिपमाला धाराशिवे, डॉ. अनुराधा धाराशिवे, शुभांगी धाराशिवे, सुवर्णा मुडपे, मेघा धाराशिवे, ऋतीक धाराशिवे, प्रतिक धाराशिवे, प्रा. अमित शिंदे, यांच्या वतीने विठ्ठल रुक्मिणी पालखीचे पुजन करून दिंडीस प्रारंभ झाला. पुढे वासनगाव येथे वासनगावचे उपसरपंच लक्ष्मण मारडकर व ग्रामसेवक शंकर बसरगे, गोविंद लोभे व समस्थ वागनगाव ग्रामस्थ यांच्या वतीने विठ्ठल रूक्मिणीचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी वासनगाव येथील ग्रामस्थ व पालकवर्ग मोठया संख्येने उपस्थित होते. वासनगात गावात पालखीचे आगमन होत असतानाच घरोघरी विठ्ठल रुक्मिणीचे पुजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यानी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन विठ्ठल नामाचा गजर करत विविध गिताचे सादरीकरण करून उपस्थिताची मने जिंकली. या सर्व विद्यार्थ्यांचे वासगनाव ग्रामस्थ व संस्थेच्या वतीने अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी अभिनंदन केले.

या आषाढी एकादशी निमित्त निघालेल्या दिंडीला यशस्वी करण्यासाठी विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलचे सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रा. ओंकार चांगलेरे, प्रा. दत्ता मोहिते, प्रा. श्रीकांत क्षिरसागर, श्रीमती शेख मॅडम, मेघा मुळे, शिंदे मॅडम, मुसने मॅडम आदिंनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आशा सताळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन विलास सगरे यांनी केले.

# तामलवाडी एमआयडीसीमध्ये गुंतवणूक करण्यास १३० लघु उद्योजकांची तयारी :आ. पाटील



धाराशिव (प्रतिनिधी) – तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे औद्योगिक क्षेत्र करण्यासाठी आपण प्रयत्नशील होतो. त्यास यश आले असून ३६७ एकरावर नवीन औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) स्थापन करण्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यामुळे गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या लघु उद्योजकांची दि. १४ जुलै रोजी सोलापूर येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत १३० लघु उद्योजकांनी गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली असल्याने यात १० हजाराहून अधिक रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

बैठकीत उपस्थित लघु उद्योजकांपैकी टेक्सटाईल साठी ८० तर गारमेंट साठी ५० जणांनी गुंतवणूक करण्यास तयारी दर्शवली आहे. या प्रत्येक उद्योगाला ५० - १०० कामगारांची आवश्यकता असल्याची माहिती उपस्थित उद्योजकांनी दिली. ही बाब अत्यंत आनंदाची असल्यामुळे आपण १० हजार रोजगार निर्मितीचे जे उद्दिष्ट ठेवले आहे, ते सहज साध्य होईल असा विश्वास वाटत असल्याचे आ.पाटील यांनी नमूद केले आहे. तसेच यावेळी उद्योजकांनी त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक पायाभूत सुविधांसह इतर अनुषंगिक बाबींची पूर्तता करण्यासाठी सामान्य सुविधा केंद्र, एक अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र व सीईटीपी उभे करण्याची मागणी आ.पाटील यांच्याकडे केली. त्यावर त्यांनी याबाबत एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी, वस्त्रोद्योग विभागाचे केंद्र व राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत बैठक लवकरच लावून याची पूर्तता केली जाईल असे आश्वासन दिले. यावेळी एमआयडीसीचे विभागीय अधिकारी, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी उपस्थित होते.

# वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात निरंतर व्याख्यानमालेची सुरुवात





देगलूर (प्रतिनिधी) : २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून शासन व विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे पदवी स्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. आंतरविद्याशाखीय, बहुविद्याशाखीय दृष्टिकोन हा या शैक्षणिक धोरणाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयात सचिव राजेश महाराज देगलूरकर यांच्या प्रेरणेतून व प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दीर्घकाळापासून निरंतर व्याख्यानमाला सुरू आहे. विशेष म्हणजे या व्याख्यानमालेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभिप्रेत असलेला आंतरविद्याशाखीय, बहुविद्याशाखीय हा दृष्टिकोन अंगीकारलेला आहे. या व्याख्यानमालेत कला आणि विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक वृंदांच्या व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत प्रति सोमवारी प्रत्येकी एक प्राध्यापक वृंदाचे व्याख्यान संपन्न होत असते. संशोधनात्मक अध्ययन व पूर्वतयारी करून प्राध्यापक वृंदातर्फे अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले जाते. तद्नंतर व्याख्यान विषयांवर उपस्थिता मध्ये प्रश्नोत्तररुपी चर्चाही घडून येते. त्यामुळे या व्याख्यानमालेतून स्वाभाविकपणे आंतरविद्याशाखीय ज्ञानाची देवाण-घेवाण होण्यास मदत होते. या वर्षीचे पहिले व्याख्यानपुष्प प्राणीशास्त्र विभाग प्रमुख व नवोदित प्रा. विवेक थावरे यांनी गुंफले. प्राण्यांचे वर्तन व संवाद हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या पहिल्या व्याख्यान पुष्प प्रसंगी नुकतीच मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळावर स्वीकृत सदस्य म्हणून निवड झालेल्या महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रा. डॉ. रवींद्र बेंबरे यांचा प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाविद्यालयातील निरंतर व्याख्यानमाले मुळे जोपासलेली अध्ययनशील वृत्ती ही मुंबई विद्यापीठातील अभ्यास मंडळाच्या स्वीकृत सदस्य पदापर्यंतच्या वाटचालीमध्ये पूरक ठरली असे मत याप्रसंगी डॉ. रवींद्र बेंबरे यांनी व्यक्त केले.

प्राध्यापक वृंदांमध्ये शैक्षणिक व विद्यार्थी विकासाचा ध्यास असणे, हेच कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या यशाचे गमक असते असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्याख्यानमालेच्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी व्यक्त करून सर्व प्राध्यापक वृंदांचे या व्याख्यानमालेच्या यशस्वीतेबद्दल अभिनंदन केले. या व्याख्यान कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्याख्यानमाला समन्वयक डॉ. मारोती बामणे यांनी केले तर आभार डॉ. गोविंद रामदिनेवार यांनी मानले.

# चापोलीच्या संजीवनी महाविद्यालयात पदव्युत्तर सूक्ष्मजीवशास्त्र अभ्यासक्रमास मान्यता




## विद्यार्थ्यांना सुवर्ण संधी

संजीवनी महाविद्यालयात पदव्युत्तर एम एस्सी गणित एम. एस्सी भौतिकशास्त्र, एम. एस्सी रसायनशास्त्र, एम. एस्सी दुग्धशास्त्र व एम. एस्सी वनस्पतीशास्त्र सोबतच आता एम. एस्सी सूक्ष्मजीवशास्त्र या अभ्यासक्रमास मान्यता मिळाल्याने विद्यार्थ्यांना सुवर्ण संधीच उपलब्ध झाली आहे. आमची संस्था गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी धडपडणारे कर्मचारी येथे कार्यरत आहेत.


**–प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे,**
**संजीवनी महाविद्यालय चापोली.**

चापोली / प्रतिनिधी– येथील नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ संचीलीत संजीवनी महाविद्यालयास पदव्युत्तर एम. एस्सी सूक्ष्मजीवशास्त्र अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने महाविद्यालय प्रशासनास मान्यता मिळाल्याचे कळविण्यात आले आहे.

१९६४ पासून लातूर जिल्ह्यातील चापोली ग्रामीण भागामध्ये नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने शिक्षणाची 'संजीवनी' अनेक वाड्या - तांड्यावरील गावातील विद्यार्थ्यांना देण्याचे कार्य आजतागायत सुरु आहे. १९९९ पासून संजीवनी महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान बी.सी.ए., बी.सी.एस.शाखेचे पदवीचे अभ्यासक्रम, ११ वी व १२ वी चे वर्ग तसेच पदव्युत्तर दूरशिक्षण माध्यमातून ११ विषयात एम. ए.व एम.काम. शिक्षणाची सुविधा सुरु केली. तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी. ए., एम. ए., गांधी विचारदर्शन, एम. ए. संप्रेश, पूर्वतयारी इत्यादी अभ्यासक्रम सुरु आहेत. तसेच ग्रामुण भागातील शेतकरी शेतमजुरांच्या मुलासाठीडॉ. नारायणराव चाटे कालेज आफ फार्मसीच्या माध्यमातुन डी.फार्मसी व बी फार्मसी अभ्यासक्रमाची सुविधा उपलब्ध करुण देण्यात आली आहे. ग्रामीण भागातील संजीवनी माहाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणाची सुविधा मिळावी यासाठी याअगोदरच एम. एस्सी गणित एम. एस्सी भौतिकशास्त्र, एम. एस्सी रसायनशास्त्र, एम. एस्सी दुग्धशास्त्र व एम. एस्सी वनस्पतीशास्त्र हा अभ्यासक्रम सुरू केला व सातत्याने पाठपुरावा करून महाविद्यालयात २०२४-२५ या वर्षापासून एम. एस्सी सूक्ष्मजीवशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मान्यता दिल्यामुळे या विषयात विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणाची एक सुवर्ण संधी उपलब्ध झाली आहे. या संधीचा लातुर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी लाभ घ्यवा असे आव्हान संस्थेचे सचिव तथा सरपंच डॉ.भालचंद्र नारायणराव चाटे यांनी केले आहे.

# वारी संस्कार देते आचरण शुद्धता व परमार्थ रुजवते: श्रीरंग महाराज





**ॲड. श्याम कुलकर्णी**

**औसाः प्रतिनिधी–** पंढरीची वारी असेल अथवा या नाथ मंदिरातील दर्शनाची वारी असेल वारी ही माणसाला मन अंतकरण शुद्ध करून सात्विक विचार जागृत करते संस्कार देते आचरण शुद्धता आणते महत्त्वाचे म्हणजे आपला सर्वांच्या सदिच्छामुळे आणि विठ्ठलाच्या दुर्गादीच्या आशीर्वादाने पंढरीच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीत समस्त वारकऱ्यांच्या वतीने आपले गुरुवर्य सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर हे सहा अध्यक्ष म्हणून आहेत व गेली कित्येक वर्षापासून आषाढी एकादशीच्या दिवशी महाराष्ट्राच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत श्री विठ्ठलाची व रुक्मिणी मातेची महापूजा करण्याचे भाग्य आपणास सर्वांना लाभली आहे.

आज पाटील सरांची बाल वारकऱ्यांची दिंडी संस्थांमध्ये एकादशी दिली सहभागी झाली त्यांनी श्री विठ्ठल श्री रुक्मिणी माता जगद्गुरु तुकाराम महाराज आणि संताचा वेशभूषा करून अगदी लयबद्ध व गोड आवाजात संपूर्ण दिंडीत सहभागी होऊन एक आदर्श आपल्यापुढे दाखवला मी त्यांचे कौतुक करतो असेही श्रीरंग महाराज यावेळी म्हणाले व श्रीनाथ प्रतिष्ठान यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांना धन्यवाद देत सतत २६ वर्षापासून या नाथ प्रतिष्ठानने अत्यंत परिश्रमातून आषाढी एकादशी दिली ही महाप्रसादाची उपासना सुरू ठेवली हा या पंचक्रोशीतील नव्या पिढी पुढे वर तरुणा पुढे एक आदर्श असल्याचे ते म्हणाले.

एकभक्तीउत्साहाचेवातावरण नाथ संस्थान आसमंतात होऊन गेले यानंतर प्रथम शामभाऊ कुलकर्णी व नंदकुमार हलकुडे यांनी संस्थानच्या स्वयंभू विठ्ठल दर्शनाची ओढ ही जुनी असून गेल्या २६ वर्षापासून नाथ प्रतिष्ठान याचे प्रमुख व सर्व तरुण सहकारी फक्त यांनी अथक परिश्रमातून या वाढीसाठी एक वेगळे स्वरूप आणले आहे महाप्रसादाची व्यापक व सुलभव्यवस्था श्री वैजनाथ आप्पा ईळेकर आणि त्यांचे सर्व पदाधिकारी व तरुण सहकारी मंडळाने आलेल्या हजारो वारकरी भावीक भक्तांचे करता महाप्रसादाचे वितरण केले.

# अवघे जीवन वारी व्हावे



आषाढी एकादशी म्हणजे समस्त वारकरयांच्या आयुष्यातील परमोच्च भक्तीचा आविष्कार!!.
केवळ महाराष्ट्रातुनच नव्हे तर विवीध राज्यातुन लाखो वारकरी चंद्रभागेच्या तीरी जमा होतात आणि आपल्या लाडक्या विठुरायाच्या चरणी नतमस्तक होतात.
वारीतील भक्तीभावाची शिदोरी घेऊन तृप्त मनाने पुन्हा आप- आपल्या गावी परततात.
हजारो वर्षांची ही परंपरा अविरतपणे आणि सातत्याने सुरु आहे. कुणी कुणाला निमंत्रण न देता , १०-१५ लाख वारकरी दरवर्षी पिढ्यान् पिढ्या एकत्र येतात.महाराष्ट्रात वारीची परंपरा चालविणारे लाखो कुटुंब असतील .अगदी खापर पणजोबा, पणजोबा, आजोबा, वडील,मुलगा, नातु अविरतपणे वारीत सहभागी होताना दिसतात.
या वारीत सर्वजण परस्पर प्रेम आणि भक्तीभावाने सहभागी होतात. ना तिथे जात पात असते, ना धर्माचा वा गरीब श्रीमंतीचा भेदभाव असतो,ना स्पर्धा असते. वारीत हिंदू , मुस्लिम, शीख ,ईसाई अशा सर्व धर्मांचे वारकरी असतात. तिथे ना कुणी मराठा, ना कुणी मागासवर्गीय, ना कुणी ओबीसी असतो. तिथे असतो फक्त आणि फक्त वारकरी. सारया विश्र्वाची एकात्मता वारीत एकवटलेली असते.
वारीत सर्वजण एकत्र राहतात, एकत्र जेवतात, एकमेकांची काळजी घेतात. घरापासून शेकडो मैल दूर असुनही कुणाला कशाचीही काळजी किंवा चिंता वाटत नाही. कारण प्रत्येकाच्या मनामध्ये एकच भाव असतो, तो म्हणजे माझा पांडुरंग माझी काळजी घेईल.
आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राची उज्वल आणि गौरवास्पद परंपरा आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्र्वर माउली, जगतगुरु संत तुकाराम, संत गोरोबा कुंभार, संत चोखामेळा,संत जनाबाई, संत दामाजीपंत, संतश्रेष्ठ एकनाथ महाराज, संत शिरोमणी नामदेव महाराज,संत निवृत्तिनाथ, संत बंका, संत भागू ,संत मुक्ताबाई, समर्थ रामदास स्वामी, संत रोहिदास, संत विसोबा खेचर, संत सखू, संत सावता माळी, संत सोपानदेव, संत सोयराबाई, संत नरहरी सोनार, संत बहिणाबाई ,अशा अगणित संतांच्या मांदियाळीने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर अलौकिक संस्कार केले . त्यामुळेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात वर्षानुवर्षे विविध जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. संतांनी आपल्या अथक प्रयत्नाने ग्रामीण भागात सामाजिक एकात्मतेचा धागा विणला. त्यामुळे महाराष्ट्राच्या समाज जीवनात सलोख्याचे व बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले.
मात्र मागील काही दिवसांपासुन महाराष्ट्राच्या ग्रामीण भागतील ही सामाजिक विण विस्कटते कि काय ? , अशी भीती वाटु लागली आहे. प्रामुख्याने आरक्षणाच्या मुद्यामुळे जाती जातींमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. वारीमध्ये एकमेकांच्या ताटात जेवणारी माणसं, एकाच ग्लासात पाणी पिणारी माणसं , गावाकडे मात्र एकमेकांच्या दुकानांवर, एकमेकांच्या कार्यक्रमांवर बहीष्काराची भाषा करतात, हे अत्यंत वेदनादायक आहे.
सध्याची ग्रामीण भागातील (प्रामुख्याने मराठवाड्यातील) सामाजिक परिस्थिती लक्षात घेता समाजधुरीणांनी गंभीरपणे विचार करुन सकारात्मक कृतीची आवश्यकता आहे.
अन्यथा शेकडो वर्षे आध्यात्मिक व सामाजिक काम केलेल्या विविध जाती धर्माच्या संतांच्या कार्याचा पराभव करणारी पिढी असा शिक्का आपल्या माथी बसेल.
म्हणून राजकारण्यांनो आणि समाजकारण्यांनो , कुणी जिंकेल , कुणी हरेल, कुणी मुख्यमंत्री होईल , कुणी मंत्री होईल, पण महाराष्ट्राचे समाज मन वर्षानुवर्षे दुभंगुन जाईल.
आजच्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने झोपेतून जागे व्हा. आणि अवघे समाजजीवन वारी होईल, यासाठी प्रयत्न करा,!!
आषाढी एकादशी निमित्त शुभेच्छासहीत !! रामकृष्ण हरी !!
**– विनायक देशमुख, अहमदनगर**

# साने गुरुजी प्राथ. व माध्य. विद्यालयात पालखी सोहळा ; विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद



लातूर : प्रतिनिधी- येथील साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील साने गुरुजी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात प्रती वर्षाप्रमाणे आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल रुक्मिणी यांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडी सोहळा मध्ये विठ्ठल रुक्मिणीच्या पादुकासह विठ्ठल नामाचा गजर करत अध्यात्मिक व वृक्षांच्या दिंडीतून वृक्षवल्ली आम्हा सोयरे म्हणत पर्यावरण जनजागृतीचा सुंदर मिलाप पहावयास मिळाला

डोक्यावर टोपी अंगात सदरा व गळ्यात टाळ अशी विद्यार्थी तर डोक्यावर तुळशी वृंदावन, गळ्यात माळ व अंगावर नऊवारी साडी अशा विद्यार्थिनी मुखातून विठ्ठल नामाचा गजर करत वातावरण भक्तीमय करत होत्या. तसेच पारंपरिक वारकरी वेशभूषेतील विद्यार्थ्यांच्या टाळांचा, विण्याचा व मृदंगाचा आवाज परिसरात घुमत होता.

संस्था सचिव कालिदास माने यांच्या हस्ते पालखीचे विधिवत पूजन करून दिंडी मार्गस्थ करण्यात आली. दिंडी अवंती नगर, सोना नगर व कुलस्वामी नगर करत शाळेच्या परिसरात विसर्जित करण्यात आली. याप्रसंगी साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक इस्माईल शेख व साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे, दोन्ही शाळांचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## अखेर नवी..

या टप्प्यानंतर वार्षिक ९ कोटी प्रवासी वाहतूक होईल, असा अंदाज सिडकोकडून व्यक्त केला जात आहे. या यशस्वी चाचणीमुळे आता काही महिन्यानंतर या विमानतळावरुन प्रवास करण्याचे नवी मुंबईकरांसह रायगडवासियांचे स्वप्न साकार होणार आहे.

१३ जुलै रोजी केंद्रीय हवाई वाहतूकमंत्री किंजरापू नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहळ यांनी विमानतळाच्या कामाचा आढावा घेऊन मार्च २०२५ पासून येथून विमानाचे उड्डाण होणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर बुधवारी अचानक नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवरून ही विमान चाचणी घेण्यात आली. यामुळे विकासक कंपनी आणि सिडकोचा विश्र्वास दुणावला आहे.

## लाडक्या...

खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली योजना आहे. जर तुम्ही अजूनही या योजनेसाठी अर्ज केला नसेल तर अजूनही अर्ज करण्याची मुदत संपलेली नाही. तुम्ही अर्ज करू शकता. या योजनेंतर्गत लाभार्थी महिलांना दरमहा दीड हजार रुपये मिळणार आहेत. म्हणजेच, प्रतिवर्ष १८ हजार रुपये मिळणार आहेत.

# यशवंत धाराशिव जिल्हा

गुरूवार दि. १८ जुलै २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com



## बेकायदेशीर मुरूम उचलणे न थांबविल्यास आमरण उपोषण

परंडा दि.१७ (प्रतिनिधी) – पिकाच्या संपादित क्षेत्रावरील मुरूम उचलण्याचे काम सुरू असून ते थांबविण्याची मागणी केली आहे. मात्र ते न थांबविल्यास १४ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा पीडिताने एका निवेदनाद्वारे तहसिलदारांना दिला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, परंडा ग्रामीण सर्वे नंबर २५ / २ रुई रोड शेताचे मालक कुमुद गजानन दीक्षित यांच्या संपादीत क्षेत्रावरील बेकायदेशीर मुरुम उचलण्यात येत आहे. रुई रस्त्यालगत १२ एकर २० आर क्षेत्र रुई बालाजी पाझर तलावास संपादित असून त्याचे क्षेत्र अंदाजे ६७ गुंडे असून ठेकेदार बेसुमार मुरुम उपसा करीत आहे. त्यामुळे त्यांच्या मालकी क्षेत्रात शेतामध्ये मोठे खड्डे पडले आहेत. संबधित ठेकेदाराचे टीप्पर चालक व जेसीबी चालक यांच्याशी संपर्क केला आसता ते म्हणाले की, आमचे मालक, ठेकेदार यांनी तहसील कार्यालयात रीतसर रॉयल्टी भरून मुरुम उपसा चालु केला आहे. दीक्षित त्यांना वनंती करीत होते माझ्या मालकी क्षेत्रावरील मुरुम उपसा बंद करा. मात्र अद्यापपर्यंत मुरुम उपसा चालु आहे. त्यामुळे या घटनेची चौकशी करून दीक्षित यांच्या झालेल्या नुकसानाची भरपाई देण्यास भाग पाडून संबंधितावर योग्य ते करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा





धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभावे यासाठी शिवसैनिक व पदाधिकारी यांनी सकाळी १० वाजता ग्रामदैवत धारासूर मर्दिनी देवीची महाआरती केली. तर हजरत ख्वाँजा शमसोद्दिन गाजी रहे मजारवर चादर अर्पण करण्यात आली. तसेच धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. तर जिल्हा शासकीय रूग्णालयात रूग्णांना फळे वाटप करण्यात आली.

या कार्यक्रमास धाराशिव तालुकाप्रमुख सतिश सोमाणी, माजी नगराध्यक्ष दत्ता बंडगर, धाराशिव शहरप्रमुख सोमनाथ गुरव, प्रविण कोकाटे, नितिन शेरखाने, माजी नगरसेवक रवि वाघमारे, तुषार निंबाळकर, राणा बनसोडे, गणेश खोचरे, प्रदिप मुंडे, पंकज पाटील, रवि कोरे, अफरोज पिरजादे, देवा नंद एडके, राम साळुंखे, दादासाहेब घोडके, सुनिल वाघ, उपशहरप्रमुख बंडू आदरकर, विजय ढोणे, गणेश साळुंखे, सुरेश गवळी, पांडुरंग भोसले, वैभव पाटील, हनुमंत देवकते, अभिराज कदम, संकेत सुर्यवंशी, कालिदास शेरकर, राकेश सुर्यवंशी, मुझीफ काझी, सुमित बागल, गणेश राजेनिंबाळकर, नाना घाडगे, प्रसाद पाटील, सह्याद्री राजेनिंबाळकर, पंकज पडवळ, अजिंक्य राजेनिंबाळकर, मुकेश चौगुले, हर्षद ठवरे, लक्ष्मण जाधव, जगदिश शिंदे, सुधीर अलकुंटे, संभाजी दळवी, राज निकम, अक्षय खळदकर, महेश देवकते, अमोल जाधव, मनोज पडवळ, ओम जाधव, संदिप शिंदे, महेंद्र शिंदे, महेश लिमये, सय्यद साबेर, कलिम कुरेशी, शहाबाज पठाण, छोटा साजिद, चेतन वाटवडे, बलराज सरकाळे, राकेश कचरे, बडड्‌ शेख, संजोग पवार, दत्ता जाधव, ओंकार बांगर यांच्यासह शिवसैनिक व युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्या बालगोपाळांची उत्साहात दिंडी



मुरूम दि.१६ (प्रतिनिधी) – आषाढी एकादशीनिमित्त प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूलच्यावतीने दि.१६ जुलै रोजी रंगला बालगोपाल दिंडीचा सोहळा. विठ्ठल नामाचा गजर करीत विद्यार्थी धोतर, टोपी, विठ्ठल–रुक्मिणीच्या व वारकऱ्यांच्या वेशभूषेत टाळ, चिपळ्या, पताका घेवून मृदुंगाच्या ठेक्यावर हरीनामाचा गजर करीत शहराच्या मुख्य रस्त्यावरती दिंडी काढण्यात आली. प्रारंभी या दिंडीचे उद्घाटन मुख्याध्यापिका अनुराधा जोशी व पर्यवेक्षक सच्छिदानंद अंबर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. डॉ. पुरुषोत्तम बारवकर, संगमेश्वर लामजने, धनराज हाळळे प्रशालेतील सर्व शिक्षकांच्या मार्गदशनाखाली विद्यार्थ्यांनी विठ्ठल–विठ्ठल असा जयघोष, मुंलीनी पारंपरिक वेशभूषेत डोक्यावर तुळस घेवून फुगडी खेळत राम–कृष्ण हरीचा गजर करीत दिंडी काढली. विठ्ठल–रुक्मिणी जीवनावर आधारीत विद्यार्थ्यांनी मनोगत, गीत व नृत्य सादर केले. सुभाष धुमाळ, विरेंद्र लोखंडे, पंकज पाताळे, सागर मंडले, संगिता देशमुख, नेहा माने, शितल घोडके, सरस्वती समन, तनुजा जमादार, प्रभावती कलशेट्टी, साधना शेवाळकर, गीता सत्रे, सरस्वती जाधव, सरोजा सारणे, अश्विनी क्षीरसागर, सोनाली कारभारी, सुधाराणी शेळके, श्रीदेवी मंडले आदिंसह विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहून दिंडी सोहळ्याचा आनंद घेतला. या दिंडीचे सुत्रसंचलन व आभार जगदीश सुरवसे यांनी मानले.

## ७९ हजार महिलांचे अर्ज ठरले योजनेसाठी पात्र

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्यासह पोषणात सुधारणा करण्यासोबतच कुटुंबातील त्यांच्या निर्णायक भूमिकेच्या बळकटीकरणासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. ही योजना राज्य सरकारची महत्त्वकांक्षी योजना आहे. जिल्ह्यातील ४ लाख ४८ हजार ६३६ महिलांना लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये शहरी भागातील ७९ हजार ३०४ व ग्रामीण भागातील ३ लाख ६९ हजार ३३२ महिलांना लाभ देण्याचे नियोजन आहे. २ ते १५ जुलैपर्यंत ९९ हजार ६६५ महिलांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये १२ हजार २१५ शहरी आणि ८७ हजार ४५० ग्रामीण महिलांच्या अर्जाचा समावेश आहे. त्यापैकी ७९ हजार ४४५ महिलांचे अर्ज या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले. यामध्ये शहरी भागातील १० हजार ३८७ आणि ग्रामीण भागातील ६९ हजार ५८ महिलांच्या अर्जाचा समावेश आहे.

यामध्ये धाराशिव शहरातील २०६४ आणि ग्रामीण भागातील १२ हजार १८६, तुळजापूर तालुक्यातील शहरी भागातील २०५९ आणि ग्रामीण भागातील ९७९८, उमरगा तालुक्यातील उमरगा व मुरूम शहरी भागातील २०२१ आणि ग्रामीण भागातील १५ हजार ७६८, लोहारा शहरातील ४६६ आणि ग्रामीण भागातील ६११२, भूम शहरातील ४८० आणि ग्रामीण भागातील ४०१३, परंडा शहरातील १४७१ आणि ग्रामीण भागातील १० हजार ५४४, कळंब शहरातील १२९६ आणि ग्रामीण भागातील ३२०५, वाशी शहरातील ५३० आणि ग्रामीण भागातील ७ हजार ४३२ असे शहरी भागातील १० हजार ३३८ आणि ग्रामीण भागातील ६८ हजार ५७ असे एकूण ७९ हजार ४४५ अर्ज योजनेच्या लाभासाठी पात्र ठरले आहेत. आतापर्यंत शहरी भागातून १५.४० टक्के तर ग्रामीण भागातून २३.६८ टक्के अर्ज प्राप्त झाले आहेत. जास्तीत जास्त महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी काढली आषाढीनिमित्त दिंडी

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) – येथील मुक्तांगण प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचा विद्यार्थ्यांनी दिंडी दि.१६ जुलै रोजी काढली. प्रारंभी बालरोगतज्ञ डॉ. मुसळे यांच्या आई–वडीलांच्या हस्ते विठ्ठल – रुक्मिणी व पालखीची पुजा करुन करण्यात आली. यावेळी शाळेच्या संस्थापिका कमलताई नलावडे यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी विविध संत, विठ्ठल रुक्मिणी व वारकरी यांच्या वेशभूषा करुन सर्वाचे लक्ष वेधले. तसेच विठ्ठल नामाच्या जयघोषात व नृत्य सादर करीत चिमुकल्यांनी पालखीची शोभा वाढविली.



कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी दिव्याग तपासणी शिबिराचे आयोजन

परंडा दि.१७ (प्रतिनिधी) – दिव्यांगांची आरोग्य तपासणी करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन परंडा येथे करण्यात आले आहे.

परंडा शहरासह तालुक्यातील दिव्यांगांची दिव्यांग प्रमाणपत्रे मिळण्यासाठी दिव्यांग उद्योग समूहाच्या पाठपुराव्यातून परंडा येथे पुन्हा एकदा नव्याने दिव्यांग तपासणी सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. त्या मागणीला अनुसरून जिल्हा चिकित्सक अधिकारी धाराशिव यांनी परवानगी दिलेली आहे त्यानुसार परंडा तालुक्यातील व शहरातील सर्व दिव्याग बांधवांची तपासणी महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी होणार आहे आपल्याकडे जर यु डी आय डी कार्ड नसेल तर येथून पुढे आपणास कोणतीही शासकीय योजनेचा लाभ घेता येणार नाही असे स्पष्ट शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. आपण ते मिळवण्यासाठी त्वरित अर्ज करावे.

अर्ज करण्यासाठी आपल्याला आधार कार्ड, रेशन कार्ड, फोटो व सही आदी कागदपत्रांची आवश्यकता असेल तरी गरजू व वंचित दिव्यांग लाभार्थ्यांनी त्वरित आपले प्रमाणपत्र तपासणी करून घ्यावी असे आवाहन संस्थापक अध्यक्ष तानाजी घोडके यांनी केले आहे.

# धाराशिव शहरातील ५९ रस्त्यांच्या कामासाठी १४० कोटी रुपयांचा निधी मंजूर – साळुंके

धाराशिव दि.१७ (प्रतिनिधी) –धाराशिव नगर परिषद अंतर्गत सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत झालेल्या भुयारी गटारीच्या कामानंतर शहरातील ५९ रस्ते दुरुस्तीच्या कामांसाठी १४० कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केला आहे. तर ही कामे ऑगस्ट महिन्यामध्ये चालू होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करुन धाराशिव शहरातील भुयारी गटार योजनेमुळे शहराची झालेली वाईट अवस्था मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच खराब झालेले मुख्य ५९ रस्ते व त्यासाठी १४० कोटी रुपयांचा विकास निधी आवश्यक असल्याचे साळुंके यांनी ना शिंदे यांना सांगितले. त्यानंतर या कामांना तात्काळ मंजुरी देऊन तब्बल १४० कोटी रुपयांचा निधी मंजूर करत असल्याचे ना शिंदे यांनी सांगितले असल्याची माहिती साळुंके यांनी दिली. यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते योगेश केदार उपस्थित होते.


मंजूर झालेल्या कामांमध्ये गणेश नगर अंतर्गत शहाबादे हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग ५२ रस्ता व नाली, गणेशनगर अंतर्गत पल्लवी हॉस्पिटल ते हुकेरे घर रस्ता व नाली, मदिना चौक ते शम्स चौक ते ताज चौक रस्ता व नाली, तालीम गल्ली अशपाक घर ते भारत विद्यालय ते विजय चौक रस्ता व नाली, सारनाथ चौक ते जरिया फंक्शन हॉल रस्ता व नाली, सारनाथ चौक ते सर्वे नंबर ११६ रस्ता व नाली, ताज चौक ते आझाद चौक ते जिल्हाधिकारी निवासस्थान ते संत गाडगेबाबा चौक रस्ता व नाली, तहसिलदार निवासस्थान ते मारवाडी गल्ली अजमेरा यांचे घर रस्ता व नाली, जिल्हाधिकारी कार्यालय ते सरदार पटेल शॉपिंग सेंटर ते लेडीज क्लब रस्ता व नाली, अंबाला हॉटेल ते सर्वे नंबर १४ ओपन स्पेस ते डंबळ हॉस्पिटल रस्ता व नाली, शिंगाडे गिरणी ते गणपती मंदिर ते संविधान चौक ते सुधीर पाटील पेट्रोल पंप रस्ता, नृसिंह मंदिर ते सिंचन भवन रस्ता, छत्रपती संभाजी महाराज उद्यान ते फुलसे यांचे घर रस्ता व नाली, मेन रोड ते बी ॲन्ड सी ऑफिस रस्ता, शेरखाने पूल ते राष्ट्रीय महामार्ग ५२ रस्ता, जुना हायवे ते ग्रीनलॅन्ड शाळा ते वीर वकील यांचे घर रस्ता व नाली, भारत गॅस गोडावून ते विनोद काकडे यांचे घर रस्ता, राहुल बागल शॉपिंग सेंटर ते भोगावती नदी रस्ता व नाली, डीआयसी रोड ते खोचरे यांचे घर ते बांगड रो हाऊस रस्ता, रामकृष्ण पेट्रोल पंप (डीआयसी) ते अष्टविनायक चौक रस्ता व नाली, विजय चौक ते जुनी गल्ली रस्ता व नाली, देशपांडे स्टॅन्ड ते आझाद चौक रस्ता, ताज हॉटेल ते माऊली चौक ते यशपाल सरवदे यांचे घर रस्ता व नाली, ताजमहल टॉकीज ते काळा मारुती चौक ते जिल्हा रुग्णालय चौक रस्ता व नाली, सह्याद्री कॉर्नर ते पंचायत समिती ऑफिस मेन रोड रस्ता, भानूनगर मधील मुख्य रस्ता रस्ता व नाली, राष्ट्रीय महामार्ग ते साठे यांचे घर रस्ता, धाराशिव नाका पाठीमागील जीएसडीसमोरील व बाजुचा मुख्य रस्ता येथे रस्ता व नाली, माऊली चौक ते ॲड.विजय शिंदे यांचे घर ते माने यांचे घर ते घोगरे यांचे घर रस्ता, नगर परिषद शॉपिंग सेंटर ते जिल्हा रुग्णालयाकडे जाणार्या रस्त्यावर रस्ता व नाली, एन. कठारे ते भन्साळी–मंत्री दुकान रस्ता व नाली, भारत विद्यालय ते लोहार गल्ली मार्गे जिजामाता उद्यान रस्ता व नाली, गालीब नगर अंतर्गत मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, शिरीन कॉलनी अंतर्गत मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, मिल्ली कॉलनी अंतर्गत मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, सुलतानपुरा अंतर्गत मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, रजा कॉलनीअंतर्गत मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, मेन रोड ते जाधववाडी रस्ता, पोहनेर ते केकस्थळवाडी जोडणारा मुख्य रस्ता, अमन इलेक्ट्रॉनिक्स ते जुना उपळा रोड रस्ता, स्मशानभूमी ते मिटकरी यांचे घर रस्ता, नगर परिषद शाळा क्र.२१ ते बोरकर यांचे घर रस्ता, संभाजी चौक ते अष्टविनायक चौक रस्ता, विकास नगर अंतर्गत रस्ता व नाली, सह्याद्री कॉर्नर ते सकाळ ऑफिस गोवर्धन यांचे घर रस्ता व नाली, मुख्य रस्ता ते आठवडी बाजारमधून एमएसईबी स्टेशनपर्यंत



मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, एलआयसी ऑफिस ते सबस्टेशनपर्यंत मुख्य रस्त्यावर रस्ता व नाली, चंद्रभागा नगर अंतर्गत रस्ता, लहुजी वस्ताद साळवे चौक ते महात्मा फुले चौक रस्ता व नाली, राष्ट्रीय महामार्ग (गॅस पंप) ते साठे यांचे घर रस्ता, शिक्षक कॉलनी अंतर्गत रस्ता व नाली, नारायण कॉलनी अंतर्गत रस्ता व नाली, शिंदे सांजा रोड ते राष्ट्रीय महामार्ग ५२ ते कोळी यांचे घर ते भोसले यांचे घर रस्ता व नाली, दत्त कॉलनी अंतर्गत कदम पीठाची गिरणी ते काकडे यांचे घर रस्ता, डेक्कन कॅम्पस अंतर्गत रस्ता, साई कॉलनी अंतर्गत मुख्य रस्ता व नाली, शिवसृष्टी अंतर्गत मुख्य रस्ता व नाली, सांजा रोड, एसटी कॉल्नी अंतर्गत जोगडे यांचे घर ते डोके कोटा रस्ता व नाली व समर्थ नगर अंतर्गत रस्ता व नाली या कामांचा समावेश आहे.




# सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल मुंबईहून अज्ञातस्थळी हनिमूनसाठी रवाना



मुंबई -बॉलिवूडची लेडी दबंग सोनाक्षी सिन्हाने नुकतेच तिचा बॉयफ्रेंड झहीर इक्बालबरोबर लग्न केलेय. या जोडप्याने बराच काळ एकमेकांना डेट केले आहे. दरम्यान, काल हे जोडपे अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या आशीर्वाद सेरेमनीमध्ये पाहुणे म्हणून दिसले होते. यावेळी सोनाक्षी सिन्हाने लाल रंगाचा ड्रेस परिधान केला होता. तसेच झहीर इक्बालने काळ्या रंगाची शेरवानी घातली होती. आता २३ जूनला लग्न करून सोनाक्षी आणि झहीर हनिमूनला रवाना झाल्याचे कळत आहे. दरम्यान मुंबई विमानतळावरून त्याचे काही सुंदर फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत.

सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल : सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल काल रात्री मुंबई विमानतळावर कॅज्युअल लूकमध्ये दिसले. तिनं ग्रे वन पीसवर चेक शर्ट आणि डोक्यावर टोपी घातली होती. यात ती पूर्णपणे दबंग दिसत होती. दुसरीकडे झहीरनं ग्रे चेक शर्टवर काळ्या कार्गो पॅन्ट परिधान केला होता. सोशल मीडियावर युजर्स सोनाक्षी आणि झहीर हनिमूनला जात असल्याचा अंदाज लावत आहेत. त्याच्या या व्हायरल व्हिडिओवर अनेकजण कमेंट्स करून त्याच्या लूकचं कौतुक करताना दिसत आहेत. एका चाहत्यानं या पोस्टवर लिहिलं, ''सोनाक्षीचा लूक खूप सुंदर आहे आणि यात ती छान दिसत आहे. दुसऱ्या एकानं लिहिलं, ''झहीर आणि सोनाक्षीचा कॅज्युअल लूक सुंदर आहे.'' याशिवाय काहीजण या पोस्टवर फायर आणि हार्ट इमोजी शेअर करत आहेत.

सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बालचं नात : सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इक्बाल याचं लग्न खूप चर्चेचा विषय सोशल मीडियावर बनले होते. या लग्नामुळे अनेकांनी त्यांना ट्रोल केलं होतं. सोनाक्षीच्या लग्नात तिचे दोन्ही भाऊ लव आणि कुश हे आले नव्हते. आता लग्नानंतर सोनाक्षी ही खूप खुश आहे. ती अनेकदा आपल्या पतीबरोबर फोटो शेअर करत असते. झहीर आणि सोनाक्षीच्या नात्याबद्दल बोलायचे झाले तर, गेल्या ७ वर्षांपासून डेट केल्यानंतर दोघांनी लग्न केले. सोनाक्षीचा डेब्यू चित्रपट 'दबंग' स्टार सलमान खाननेही सोनाक्षीच्या लग्नाला हजेरी लावली होती. या लग्नाला सलमान खानबरोबर अनेक स्टार्स उपस्थित होते.

# एअरपोर्टवर पॅप्सवर ऐश्वर्याची लेक आराध्या संतापली; युजर्स म्हणाले, जया बच्चन..



मुंबई,-बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चन केवळ तिच्या अभिनय आणि सौंदर्यासाठी इंडस्ट्रीत ओळखली जात नाही तर तिच्याकडे एक जबाबदार आई म्हणूनही पाहिले जाते. ऐश्वर्या नेहमीच आपली मुलगी आराध्यासोबत सावलीसारखी फिरताना दिसली आहे. लग्नकार्य असो, कार्यक्रम असो किंवा विमानतळावर, ती नेहमीच आराध्यासोबत दिसते. आराध्या आणि ऐश्वर्याचा एक व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये पहिल्यांदाच ऐश्वर्याची लाडकी लेक पापाराझींवर संतापली असल्याचे दिसून आले.

पॅप्सवर संतापली आराध्या...

ऐश्वर्या राय बच्चन नुकतीच मुलगी आराध्यासोबत विमानतळावर दिसली. यावेळी आई आणि मुलगी दोघीही ब्लॅक कलर मॅचिंग आउटफिटमध्ये दिसल्या. या दोघांचा एक व्हिडिओ समोर आला आहे. ज्यामध्ये ऐश्वर्या आणि आराध्या एअरपोर्टवर चेक इन करताना दिसत आहेत. त्याच दरम्यान तिथे असलेल्या पापाराझींनी त्यांना आपल्या कॅमेऱ्यात टिपण्याची धडपड सुरू केली. तेवढ्यात मागे एक पापाराझी ऐश्वर्या आणि आराध्याला आपल्या मोबाईलमध्ये कैद करत होता आणि त्यांच्या मोबाईलमधून एक विचित्र आवाज आला. हे पाहून आराध्याला त्याच्यावर रागवते. यानंतर आराध्या तिची आई ऐश्वर्यासोबत आत जाते आणि निघताना तिने पापाराझींना खूप प्रेमाने निरोप देताना दिसते.

व्हिडीओवर नेटकऱ्यांच्या कमेंट्स...

आराध्या बच्चनचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओवर नेटकऱ्यांकडून अनेक प्रतिक्रिया येत आहेत. अनेक वापरकर्ते आराध्याच्या प्रोटेक्टिव्ह स्वभावाचे कौतुक करत आहे. तर अनेकजण तिची आजी जया बच्चन यांच्याशी तुलना करत आहेत. एका यूजरने लिहिले की, 'जयाचा आत्मा तिच्यात आला आहे.' दुसरा युजर लिहितो, 'ही आपली आजी जयावर गेली आहे का?' एकाने लिहिले, 'अभिषेक इथेही तुझ्यासोबत का नाही?' अशा अनेक कमेंट्स या व्हिडिओवर आहेत.

# महागाईचे कडे, बँकिंगचे लक्षवेधी आकडे

अर्थनगरीतून : महेश देशपांडे, आर्थिक घडामोडींचे अभ्यासक

गव्हाच्या किमती वाढल्याने, नव्या सरकारकडून आयातीला मोकळीक मिळण्याची शक्यता आहे. मात्र सर्वसामान्यांची थाळी महाग झाल्याचे आकडेवारी सांगत आहे. याच सुमारास बँकिंग व्यवहारांमध्ये वाढ झाली असली, तरी फसवणुकीचे प्रकारही वाढल्याची आकडेवारी समोर आली आहे. दुसरीकडे, बँकांच्या विविध खात्यांमध्ये ७८ हजार कोटी रुपये पडून असल्याची माहिती समोर आली आहे.सध्या गहू उत्पादक शेतकऱ्यांना अच्छे दिन' आले आहेत. कारण गव्हाच्या किमतीत वाढ झाली आहे. सरकारने या वर्षी गव्हाचे विक्रमी उत्पादन झाल्याचा दावा केला आहे; मात्र दुसरीकडे गहू आयात करण्याची शक्यता आहे. देशात नवीन सरकार स्थापन होताच, गव्हाची आयात होण्याची शक्यता आहे. गव्हाच्या वाढत्या किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, गहू आयातीचा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गव्हाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. सरकारी खरेदीची प्रक्रिया अद्याप संपलेली नाही आणि सध्या देशांतर्गत बाजारात गव्हाचा भाव २,४३५ रुपये प्रतिक्विंटलवर पोहोचला आहे. वर्षभरापूर्वी याच वेळी तो २,२७७ रुपये होता. खुल्या बाजारात गव्हाची किंमत २,२७५ रुपये निश्चित केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे सरकार खरेदीच्या लक्ष्यापासून खूप दूर आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार गव्हाची किरकोळ किंमत ३०.७१ रुपये प्रतिकिलो आहे. एक वर्षापूर्वी ती २९.१२ रुपये होती, तर पिठाची किंमत ३५.९३ रुपये प्रतिकिलो आहे. गेल्या वर्षी ती ३४.३८ रुपये होती. अशा परिस्थितीत गव्हाची वाढती महागाई रोखण्यासाठी केंद्र सरकार गव्हाच्या आयातीबाबत मोठा निर्णय घेऊ शकते. पदभार स्वीकारल्यानंतर नवीन सरकार शून्य सीमा शुल्कावर गव्हाच्या आयातीला परवानगी देण्याची शक्यता आहे.

आजघडीला देशातील गव्हाच्या किमती उच्चांकावर पोहोचल्या आहेत. दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, सध्या सरकारने गव्हाच्या आयातीवर ४४ टक्के सीमा शुल्क लावले आहे. कोची, थुथुकुडी आणि कृष्णपट्टणम या दक्षिण भारतीय बंदरांमधूनच गहू आयात करण्याची परवानगी आहे. आता तब्बल सहा वर्षांनंतर गहू आयात होण्याची शक्यता आहे. दरम्यान जागतिक स्तरावर गव्हाचे भाव दहा महिन्यांमधील सर्वोच्च पातळीवर असल्याचे सांगण्यात येत आहे. अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात आणायच्या असल्यास, भारताला गहू आयात करावा लागेल, कारण ऑक्टोबरच्या आसपास मागणी-पुरवठा संतुलन बिघडू शकते, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. कृषी मंत्रालयाने भारतात या वर्षी मोठ्या प्रमाणात गव्हाचे उत्पादन होण्याचा अंदाज वर्तवला होता.




भारतात गव्हाचे विक्रमी १,१२१ लाख टन उत्पादन होण्याचा अंदाज आहे. भारतीय अन्न महामंडळाने ७५ लाख टन गव्हाचा साठा आहे. हा गेल्या १६ वर्षांमधील सर्वात कमी साठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत गव्हाची अधिक खरेदी झाली आहे. या वर्षी उत्पादन जास्त आहे; परंतु वर्षाच्या उत्तरार्धात विशेषत: ऑक्टोबरमध्ये साठा कमी असू शकतो, तेव्हा आपल्याला जास्त भाव मिळेल, या आशेने शेतकरी त्यांच्या उत्पादनावर तग धरून आहेत.महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी, रिझर्व्ह बँकेने एका वर्षाहून अधिक काळ रेपो दर ६.५ टक्के ठेवला आहे. त्यामुळे महागाई पाच टक्क्यांच्या खाली आहे; मात्र तरीही सर्वसामान्यांची थाळी महाग आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या वार्षिक अहवालात यामागील कारण दिले आहे. रिझर्व्ह बँकेची कमाई, तिची संपत्ती आणि बँकांकडे पडून असलेला दावा न केलेला पैसा यांचा तपशीलही प्रसिद्ध करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेच्या अहवालात म्हटले आहे की, २०२३-२४ या आर्थिक वर्षात देशातील महागाई वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे सामान्य माणसाच्या मुख्य अन्नाच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ. कितीही प्रयत्न केले, तरी गहू, तांदूळ आणि डाळीच्या किमती आटोक्यात येत नाहीत. देशाच्या मूलभूत चलनवाढीचा दर वाढवण्यात खाद्यपदार्थांच्या किमतींचा वाटा ६०.३ टक्के आहे. २०२२-२३ मध्ये तो केवळ ४६ टक्के होता. अहवालानुसार, अनिश्चित पुरवठा आणि कमकुवत साठा यांनी अन्नधान्य महागाई वाढवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. यामुळे चार टक्के अपेक्षित असलेला मूळ महागाई दर सात टक्क्यांच्या जवळ पोहोचला आहे. अन्नधान्याच्या महागाईने तर ८.५ टक्क्यांहून अधिक पातळी ओलांडली आहे. रिझर्व्ह बँकेने असेही म्हटले आहे की, २०२३-२४ या आर्थिक वर्षामध्ये त्यांच्या ताळेबंदाचा आकार ११.०८ टक्क्यांनी वाढून ७०.४७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताळेबंदाचा आकार ३१ मार्च २०२४ पर्यंत सात लाख २ हजार ९४६.९७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. अर्थात त्याचा परिणाम गरिबांचे जगणे सुसह्य होण्यावर झालेला नाही.

देशातील बँक फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये एका वर्षात १६६ टक्के वाढ झाली आहे. २०२३-२४ मध्ये एकूण ३६ हजार ७५ लोक बँक फसवणुकीला बळी पडले. २०२२-२३ मध्ये त्यांची संख्या केवळ १३ हजार ५६४ होती. अर्थात अर्थविषयक घडामोडीही मोठ्या प्रमाणात वाढल्या असून गुंतवणूक आणि नोटा छपाईबाबत नवे आकडे समोर आले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालानुसार, सर्वाधिक ८० प्रकरणे क्रेडिट/डेबिट कार्ड आणि इंटरनेट बँकिंगशी संबंधित होती. ११.५ टक्के प्रकरणे कर्जाशी संबंधित होती. यामध्ये फोनवरच केवायसी करत मोठ्या व्याजाचे कर्ज ग्राहकांच्या खात्यांमध्ये ट्रान्सफर करण्यात आले. ५.५ टक्के लोकांची बँकांमध्ये पैसे जमा करताना फसवणूक झाली. फसवणुकीच्या संख्येत अनपेक्षित वाढ होऊनही गमावलेली रक्कम ४६.६६ टक्क्यांनी कमी होती. २०२२-२३ मध्ये बँक ग्राहकांनी एकूण २६.१२ हजार कोटी रुपयांची रक्कम गमावली होती. २०२३-२४ मध्ये ही रक्कम १३.९३ हजार कोटींवर आली. २०२१-२२ मध्ये फसवणूक प्रकरणांची संख्या ९,०४६ होती. देशात अलीकडच्या काळात २.२२ लाख बनावट नोटा सापडल्या. १००, ५०० रुपयांच्या बनावट नोटांचे प्रमाण कमी झाले असून, २०० रुपयांच्या बनावट नोटांची संख्या वाढली आहे.

बँकांच्या खात्यांमध्ये दावा न केलेली रक्कम सतत वाढत आहे. बँकांमधून दावा न केलेले पैसे काढणे पूर्वीपेक्षा सोपे झाले असूनही त्याची दखल घेणारे कोणी नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बँकांमध्ये दावा न केलेली रक्कम २६ टक्क्यांनी वाढून ७८ हजार २१३ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या वार्षिक अहवालानुसार, मार्च २०२३ अखेर ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधीमधील रक्कम ६२ हजार २२५ कोटी रुपये होती. खात्यात दहा किंवा त्याहून अधिक वर्षांपासून पैसे पडून आहेत. दहा किंवा अधिक वर्षांपासून त्यांच्या खात्यात पडून असलेल्या खातेदारांचे हक्क न सांगितले गेलेले पैसे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधीमध्ये हस्तांतरित करतात. रिझर्व्ह बँकेने वर्षाच्या सुरुवातीला खातेधारकांना मदत करण्यासाठी बँकांद्वारे अवलंबल्या जाणाऱ्या उपाययोजनांबाबत आणि सक्रिय खात्यांवरील विद्यमान नियम अधिक वापरकर्ता अनुकूल बनवण्याच्या उद्देशाने मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. यापूर्वी बँकांमध्ये जमा केलेले दावा न केलेले पैसे सत्यापित करण्यासाठी आणि काढण्यासाठी आरबीआयने ३० बँकांना उद्गम पोर्टलशी जोडले होते. दावा न केलेल्या पैशांशी संबंधित माहिती उद्गम पोर्टलवरून सहज मिळवता येते. दावा न केलेल्या पैशांशी संबंधित माहिती मिळवायची असल्यास, पोर्टलवर तुमचे नाव आणि मोबाइल नंबर देऊन नोंदणी करणे आवश्यक आहे.

या पोर्टलवर अनेक बँकांची दावा न केलेली रक्कम मिळू शकते. दावा न केलेल्या ठेवींवर केवळ संबंधित बँकेकडून क्लेम करता येईल. मार्च २०२३ पर्यंत दावा न केलेल्या ठेवींची रक्कम ४२,२७० कोटी रुपये होती. आता ती वाढून ७८ हजार २१३ कोटी रुपये झाली आहे.

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार ओळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे- प्राचार्य डॉ.हरिदास राठोड



**मुखेड (प्रतिनिधी)** भारतीय संविधानाने आपणास दिलेला महत्त्वपूर्ण अधिकार म्हणजे मताचा अधिकार आहे. परवा आपल्या देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्या त्यावेळेस आपणास मताची किंमत कळाली असेल. काही खासदार तर अल्प मतांनी निवडून आले. मुंबईत तर केवळ ४८ मताने एक खासदार निवडून आले. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व अन्य निवडणुकां मध्ये आपण पाहतो की एका मताला देखील अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. लागलीच काही महिन्यांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीतही आपल्याला मतदानाचा अधिकार बजावता यावा म्हणून ज्यांनी अद्याप पर्यंत मतदार यादीत नाव नोंदणी केली नसेल अशांनी तात्काळ ती नोंदणी जुलै २०२४ पर्यंत करून घ्यावी. त्याचबरोबर आपल्या परिवारातील किंवा आप्तेष्ट,मित्रांपैकी कोणी असे राहिले असेल तर त्यांना मतदार यादीत नाव देण्यासाठी प्रेरित करावे. शासन या कामी प्रामाणिक प्रयत्न करत आहे. त्याला आपण उत्तम प्रतिसाद द्यावा. दानाचे अनेक प्रकार असून मतदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.हरिदास राठोड यांनी ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान )महाविद्यालय, वसंतनगर ता.मुखेड जि.नांदेड येथे राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित नव मतदार नोंदणी जनजागृती एकदिवसीय शिबीरप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना केले.

यावेळी तलाठी सज्जा पांडुर्णी येथील श्री सतीश देशमुख यांनी नव मतदारांना आपले नव्याने नाव नोंदवताना कोणकोणती कागदपत्रे लागतात व त्याची प्रक्रिया काय याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा या कार्यक्रमाचे संयोजक प्रा.डॉ.शंकरय्या कळ्ळीमठ यांनी करून शिबीर आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन तथा आभार प्रसिद्ध विभाग प्रमुख प्रा.डॉ.रामकृष्ण बदने यांनी केले.

कार्यक्रमास जांब (बु.)ता.मुखेड येथील मंडळ अधिकारी श्री संदीप फड, निवडणूक विभाग ऑपरेटर बबलू शेख,सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी बहुसंखेने उपस्थित होते.

# मोफत आरोग्य तपासणी शिबीर

**उदगीर (प्रतिनिधी)** २० जुलै २०२४ रोजी उदगीरात त्र्यंबकेश्वर येथील आर्वेदिक तज्ञ डॉ.चारुशीला पाटील ,डॉ. शुभांगी गौरकर यांच्या उपस्थितीत मोफ्फत आरोग्य तपासणी शिबिर

अखिल भारतीय श्री. स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर व सद्गुरु परमपूज्य मोरदादा चारिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट अंतर्गत मोफ्फत आरोग्य तपासणी व नाडी परीक्षण शिबिराचे दिनांक २० जुलै २०२४ वार - शनिवार दिवशी वेळ सकाळी १०ते रात्री ७ या वेळेत रघुकुल मंगल कार्यालयासमोरील जय वीर हनुमान मंदिर बिदर रोड उदगीर येथे त्र्यंबकेश्वर जिल्हा नाशिक येथील आयुर्वेदिक तज्ञ डॉ. चारुशीला पाटील, डॉ. शुभांगी गौरकर यांच्या उपस्थितीत हृदयविकार ,मधुमेह, सर्व प्रकारचे कॅन्सर ,रक्तदाब सांधेविकार,त्वचा विकार ,वात विकार,पोटाचे विकार,महिलांचे विकार, मुतखडा, मुळव्याध, कावीळ, लहान मुलांचे विकार, इत्यादी विकाराचे रोग निदान मोफ्फत केले जाणार असून या आरोग्य शिबिराचा उदगीर, देवणी, जळकोट शहर व परिसरातील सर्व नागरिक, सेवेकरी,भाविक - भक्त यांनी लाभ घ्यावा असे सचिन बामनपल्ले, रेखा जाधव, सरिता द्वासे,माधव सूर्यवंशी,विनायक गादा,विशाखा गादा ,निवृत्ती जवळे, सुनीता हंडरगुळे,कविता बिरादार,ममता बिरादार,सविता डावकरे,बाबासाहेब देशमुख, शुभांगी नादरगे,अनुसया कनकुरे यांच्यासह समर्थ सेविकाऱ्यांनी केले आहे. शिबिराला येताना मागील काळातील व चालू काळातील आरोग्य विषयक कागदपत्राची फ्फाईल सोबत घेऊन येणे.आरोग्य शिबिरासाठी पूर्व नाव नोंदणी आवश्यक आहे.

# कै. रसिका महाविद्यालयाच्या कांबळे इंद्रजीत खेळाडूची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड



**देवणी (प्रतिनिधी)** कै. रसिका महाविद्यालयातील विद्यार्थी कांबळे इंद्रजीत ( बीएससी तृतीय वर्ष ) याची लातूर जिल्हा कबड्डी असोसिएशन तर्फ्फे लातूर जिल्ह्याच्या संघात निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन तर्फ्फे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा पुणे येथे आयोजित स्पर्धेत लातूर जिल्ह्याच्या संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. या विद्यार्थ्यास प्रा. डॉ. सचिन चामले (शारीरिक शिक्षण संचालक) यांचे मार्गदर्शन लाभले आहे. कांबळे इंद्रजीत याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल संस्था अध्यक्ष मा.श्री. गोविंदरावजी भोपणीकर साहेब, संस्था सचिव मा.श्री. गजाननजी भोपणीकर साहेब, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे सर,उपप्राचार्य डॉ.शिवाजी सोनटक्के यांनी खेळाडूचे अभिनंदन केले आहे.तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.बी.आर.झेंडे, ४ थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५१२/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Basling Gundappa Swami Mathpati हे दिनांक ०६.०३.२०२३ रोजी Malewadi, Udgir, Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Rajkumar S/o. Basling Swami Mathpati, Age 57 yrs, Occu. Business Address- R/o. Kapad Society, Udgir Dist.Latur

2) Vilas S/o. Basling Swami Mathpati, Age 69 yrs, Occu. Retired, Address- R/o. Prbhani.

3) Sushila W/o Shivdas Swami, Age 68 yrs, Occu. Homemaker, Address- R/o. Kapad Society, Udgir Dist.Latur

4) Subhash S/o. Basling Swami Mathpati, Age 64 yrs, Occu. Service, Address- R/o. Adarsh coloney, Aurangabad.

5) Ashok S/o. Basling Swami Mathpati, Age 60 yrs, Occu. Retired, Address- R/o. Malewadi, Udgir Dist.Latur

यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Rajkumar S/o. Basling Swami Mathpati | 57 | Son |
| 2) | Vilas S/o. Basling Swami Mathpati | 69 | Son |
| 3) | Sushila W/o Shivdas Swami | 68 | Daughter |
| 4) | Subhash S/o. Basling Swami Mathpati | 64 | Son |
| 5) | Ashok S/o. Basling Swami Mathpati | 60 | Son |

अर्जदार याने Basling Gundappa Swami Mathpati या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Basling Gundappa Swami Mathpati यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः १२/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १७/०८/२०२४

आदेशावरुन

(ए.बी.सुर्यवंशी)
कनिष्ठ लिपिक
४ थे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

(एम.एल.सुत्राळे)
सहा.अधिक्षक,
४ थे सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

**झाडे लावा झाडे जगवा**

# ज्ञान व चातुर्याचा उगम म्हणजे कथा चाणक्य होय- तुळशीदास बिरादार




**उदगीर (प्रतिनिधी)** अज्ञानाला दूर सारून सत्याची जाणीव करून देण्याचे काम कथांच्या माध्यमातून घडते. अनंत शक्यतांचे गारुड घालण्याचे सामर्थ्य हे कथांमध्येच असते. ज्या कथांचा केंद्रबिंदू जनतेचा उत्कर्ष हाच असतो त्या कथा मानवनिर्मित व नैसर्गिक आपत्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू शकतात. अशाच आधुनिक काळाचा संदर्भ असलेल्या सर्वोत्तम रणनीतीतज्ञ, विचारवंत चाणक्य यांच्या ध्येयवादी व्यवहारी ज्ञान आणि चतुर्याच्या संदर्भाचा उगम असलेल्या कथा म्हणजेच कथा चाणक्य होय, असे मत प्रसिद्ध नाट्य लेखक तुळशीदास बिरादार यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात अंतर्गत चालू असलेल्या व समाजसेवक दिलीपकुमार गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या ३१७ व्या वाचक संवाद मध्ये सुप्रसिद्ध नाटककार तुळशीदास बिरादार यांनी राधाकृष्णन पिल्लई लिखित कथा चाणक्य या साहित्यकृतीवर संवाद साधताना ते म्हणाले की, समर्पण आणि शिस्तीचे भोक्ते असलेले चाणक्य त्यांची स्वयंशिस्त, कुटुंबा वरचे ध्यान, जबाबदारीची जाणीव, शिक्षण, अधिकार, शक्ती, युद्धनीतीतील रणनीतीतज्ञ, राज्यकर्ते घडवणारा म्हणून जितके त्यांच्याबद्दल जाणावे तितके अधिकाधिक जाणून घेण्याची आस वाढते. त्यांच्यापासून प्रेरित व प्रचलित झालेल्या कथा या ऐतिहासिक, पारंपारिक तर काही काल्पनिकही आहेत. बहुतेक कथांमध्ये गुरु शिष्यांमधील चर्चा, वादविवाद तर काही सार्वजनिक प्रसंग रेखाटलेले आहेत. बऱ्याच कथांमध्ये चाणक्य व त्यांचे शिष्य राजा चंद्रगुप्त हे दोनच पात्रे आहेत. प्रत्येक कथेत सुरुवातीला आचार्यनीती व आचार्य कथा तर शेवटी ज्ञानबिंदू म्हणून सारांश मांडलेला आहे. या सर्व कथा स्वप्नाळू आणि विचारवंत व्यक्तींसाठी महत्त्वाच्या आहेत.

यानंतर झालेल्या चर्चेत,मोहनराव निडवंचे, केजकर राजनंदिनी राजेंद्र यांचेसह अनेकांनी उत्स्फ्फूर्त सहभाग नोंदवला. शेवटी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला . यावेळी लहान बालकांनाही वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने चालू केलेला ममी वाचलेले पुस्तकफ या सदराखाली कुमारी शर्वरी सोमवंशी या मुलीने ती वाचलेल्या पुस्तकातील काही कवीता व गीत गाऊन दाखवल्या. शेवटी अध्यक्षीय समारोपात समाज सेवक दिलीपकुमार गायकवाड म्हणाले की चाणक्याचे हे समृद्ध विचारधन म्हणजे आत्मविकासाचे साधन आहे.आपण समाजाचे घटक आहोत त्याचे उत्तराई होण्याचा प्रयत्न केले पाहिजेत असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत कदम यानी केले, संवादकांचा परिचय यशवंतराव बिरादार यानी करून दिला. अध्यक्षांचा परिचय शरदकुमार खोंडे यांनी तर आभार राम भाऊ जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. राजपाल पाटील, मिठू पाटील, आनंद बिरादार, सावरगावे गोविंद, हनुमंत मेत्रे, सुरेश वजनम, सुरेश शिंदे व मुरलीधर जाधव आदिंनी प्रयत्न केले.

# हंडरगुळी शिवारातील पिकांवर वन्य प्राण्यांचा हल्ला;वावरात वाढला रान डुकरांसह हरणांचा कल्ला ..

**हंडरगुळी (प्रतिनिधी)** उदगीर तालुक्यातील वाढवणा बू.मंडळातील हंडरगुळी या गावातील तसेच परिसरातील खरिप पिके सध्या बरी दिसत असलीतरीही या पिकांमध्ये रानडुकरं,हरिण,मोरंवसायाळ या वन्यप्राण्यांनी धुडघूस घातला असुन,चांगली मोड फ्फुटलेल्या पिकांवर हल्ला करित एकच कल्ला करित आहेत.यामुळे हैराण झालेला शेतकरीबांधव पिकांच्या रक्षणासाठी नानाविध प्रकारच्या केलेल्या सगळ्या ङ्गआयडीयाङ्घ्या ङ्गफ्फेलङ्घ जात असलेने शेवटचीङ्गआयडीयाङ्घ म्हणुन वावरात जागोजागी लाकडी मेखा रोवुन त्यास ङ्गबायडींगङ्घ तार जोडल्याचे दिसते.दरम्यान याकडे संबंधित विभाग लक्ष देत नसल्याने नाराजी पसरली आहे. यंदा कित्येक वर्षानंतर मिरगात खरीप पिकांची पेरणी झाली.नंतर १ , २ वेळा चांगला पाऊस झाल्याने तुर, मुग,उडीद,सोयाबीन,ज्वारी, तीळ आदी पिकांची चांगली उगवण झाली आहे.यामुळे शेतकरी आनंदी दिसत असलातरीही या आनंदावर विरजण पडण्याची शक्यता आहे.कारण यंदा पहिल्याच पावसावर पेरलीली खरीप हंगामातील कोवळ्या पिकांमध्ये रान डुकरं,हरणं,मोर,सायाळ या वन्य पशु, पक्षांसह पैशांचा धुडघुस वाढल्याने ही कोवळी पिके नेस्तनाबुत होतात. अगदोरच महागडी खते,बि-बियाणे विकत घेऊन पेरलेली सगळी पिकं हे चांगली उगवली असलीतरी ही यात एकच ङ्गकल्लाङ्घकरुनवन्यप्राणी,पक्षी कोवळ्या पिकांवर ङ्गहल्लाङ्घ करतात.व ही पिके नष्ट करित असुन,वनविभाग बघ्याची भुमिका घेत असल्याने हाळी हंडरगुळी परिसरातील शेतकरीवर्ग संबंधित अधिका-याबद्दल नाराज दिसुन येत असुन,संबंधित वरिष्ठांनी तरी चालढकल न करता या बाबतीत त्वरीत पाहणी व उपाययोजना करणे गरजेचे आहे..

उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो




**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

**मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय**

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेंद्रे सचिव






# विवेकानंद रुग्णालयात स्व. सुरेशराव केतकर स्मृती गुणवंत कर्मचारी पुरस्कार व गोकुळ शिष्यवृत्ती वितरण सोहळा उत्साहात

लातूर : येथील विवेकानंद रुग्णालयात प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही स्व. सुरेशराव केतकर स्मृती गुणवंत कर्मचारी पुरस्कार तसेच गोकुळ शिष्यवृत्ती वितरण सोहळा मंगळवारी उत्साहात पार पडला.

विवेकानंद रुग्णालयात स्व. सुरेशराव केतकर स्मृती गुणवंत कर्मचारी पुरस्कार २०२४ व गोकुळ शिष्यवृत्ती वितरण सोहळा समर्पित जीवनाचे मानकरी, कर्तव्य कठोर, ज्येष्ठ संघ स्वयंसेवक स्व. सुरेशराव केतकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी गुणवंत कर्मचारी पुरस्कार दिला जातो. यामध्ये अनुशासन, रुग्णालयाप्रती निष्ठा, रुग्ण व नातेवाईकांसोबतची वागणूक, कामाबद्दलचे ज्ञान, सामाजिक जीवनातील सहभाग यांसारख्या निकषांच्या आधारे पुरस्काराचे मानकरी दरवर्षी निवडले जातात. यावर्षी हा पुरस्कार वितरण सोहळा डॉ. नितीन धर्मराव (वैद्यकीय अधिकारी वर्ग – २ शासकीय सेवा व रा.स्व.स. जिल्हा कार्यवाह) व स्व. सुरेशरावांचे पुतणे शिरीष केतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी, दि. १६ जुलै रोजी पार पडला. यावेळी पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे काका, डॉ. सौ. ज्योत्स्नाताई कुकडे, डॉ. गो. रा. भराडिया, एड. अनिल अंधोरीकर, डॉ. अरुणा देवधर, डॉ. दिलीप देशपांडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर पुरस्कार, परिचारक, तंत्रज्ञ, सुरक्षा विभाग, प्रशासन कर्मचारी व निवासी वैद्यकीय अधिकारी या विभागांतर्गत देण्यात येतो. यावर्षीचे पुरस्कार ओ. टी. टेक्निशियन संदीप पाटील, लिपिक अमोल गंगणे, कॅथलॅब टेक्निशियन सोमनाथ कोकणे, परिचारिका मीरा बोडके, सफाई कर्मचारी सुनिता माशाळ , सेवक अनिल पुजारी, डायलिसिस टेक्निशियन सहदेव गावकरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना कासले यांना देण्यात आले.

तर राधेश्याम जोशी, संजय पांचाळ, ऋषिकेश पांचाळ याना गोकुळ शिष्यवृत्ती देण्यात आली. पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी विवेकानंद रुग्णालयाचे संस्थापक सदस्य व ज्येष्ठ फिजीशियन डॉ. गोपीकिशन भराडिया काका यांनी आपल्या मार्गदर्शनात केतकर काकांच्या स्मृतींना उजाळा दिला. ते म्हणाले, सुरेशरावांनी आम्हाला रुग्णालयास विवेकानंद हे नाव देताना सांगितले की, तुम्ही सदैव विवेक बुध्दीने व गतीशीलतेने कार्यरत राहावे. Coming and working together हे सोपे आहे. पण Staying together is more important आणि आम्ही आमच्या विचारसरणीत व कृतीत सदैव सेवाभाव आणि विवेक जागृत ठेवला. त्यामुळे विवेकानंद रुग्णालयाने जवळ जवळ सहा दशके एवढा प्रदीर्घ प्रवास यशस्वीरित्या पूर्ण केला आहे, असे काकांनी अभिमानाने नमूद केले

. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. नितीन धर्मराव यांनी आपल्या मनोगतामध्ये केतकर काकांच्या समाजातील प्रत्येक घटक व कुटुंबाविषयीची आपूलकीची भावना, शिक्षण काळात त्यांनी केलेली मदत अशा अनेक हृद्य आठवणींना उजाळा दिला, डॉक्टरांनी निः स्पृह सेवार्थी, कमी शब्दात जास्त परिणामकारकता असणारी व्यक्ती, वक्तशीर अशा शब्दात केतकर काकांचे वर्णन केले.

तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून स्व. केतकर काकांसारखे आजवर शेकडो स्वयंसेवक तयार होण्याचे प्रमुख कारण म्हणजे मशुध्द सात्विक प्रेम हमारे कर्तव्य का आधार हैफ अशा भावपूर्ण शब्दात आपल्या मनोगताचा समारोप केला. पुरस्कार प्राप्त सर्व कर्मचाऱ्यांनी आदर्श सेवाव्रतीच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा पुरस्कार मिळणे ही खूप



आनंददायी व अभिमानाची बाब आहे, तसेच विवेकानंद रुग्णालय हा सर्व कर्मचाऱ्यांना कौटुंबिक बांधिलकीने व आपूलकीने सामावून घेणारा परिवार आहे, असे मनोगत व्यक्त केले.

रुग्णालय स्थापनेपासून विवेकानंद रुग्णालय हा एक परिवार आहे ही भावना सदैव जपणारे रुग्णालयाचे पालक डॉ. अशोकराव कुकडे काका व डॉ. ज्योत्स्नाताई कुकडे काकू यांनी मागील वर्षांपासून रुग्णालयातील गरजू कर्मचाऱ्यांच्या होतकरु पाल्यांच्या उच्च व विशेष शिक्षणात मदत म्हणून गोकुळ शिष्यवृत्ती सुरु केली आहे. ही शिष्यवृत्ती गोखले, कुकडे लवळेकर (कुकडे काका यांची कन्या डॉ. अनधा लवळेकर) या तीन कुटुंबामार्फत दिली जात आहे. या शिष्यवृत्तीचे वितरणही गुणवंत कर्मचारी पुरस्कार प्रदान कार्यक्रमात करण्यात आले.

# आलमला ब्ल्यु बर्ड स्कुलची आषाढी एकादशीनिमित्त दिंडी

औसा (प्रतिनिधी) : तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांची दिंडी मोठया उत्साहात काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रूक्मिणी व विविध संताच्या, वारकऐयांच्या वेषभुषेत,टाळ मृदंगाच्या गजरात तसेच ज्ञानोबा तुकारामाच्या नामघोषात आलमला गावात पायी दिंडी व पालखी मिरवणुक काढण्यात आली. या प्रसंगी शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्रांगणात फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, डॉ. कैलास कापसे, डॉ. सुरजमल मालपाणी, प्रा. शिवशंकर वागदरे, प्रा. प्रविण घुले, ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे, ब्ल्यु बर्ड ज्युनिअर



सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर यांच्या वतीने पालखीचे पुजन करून दिंडीस प्रारंभ झाला. पुढे रामनाथ विद्यालय आलमलाचे मुख्याध्यापिका अनिता पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, पि.सी. पाटील सर यांच्या वतीने विठ्ठल रूक्मिणीचे पुजन करण्यात आले.

आलमला गावात संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, संचालक जयशंकर हुरदळे, विश्वनाथ निलंगेकर, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, आलमला गावचे सरपंच विकास वाघमारे, विश्वनाथ बिराजदार, कैलास निलंगेकर, अमरसिंह हजारी, उमाकांत बिराजदार, महिशंकर बिराजदार, कंकरसिंग हजारी, शिवकुमार पाटील, सिध्दलिंग निलंगेकर, बाबा निलंगेकर, महेश पाटील यांच्या उपस्थितीत विठ्ठल रुक्मिणी पालखीचे पुजन करण्यात आले यांप्रसंगी विद्यार्थ्यानी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातुन विठ्ठल नामाचा गजर करत विविध गिताचे सादरीकरण करून उपस्थिताची मने जिंकली. या आषाढी एकादशी निमित्त निघालेल्या दिंडीला यशस्वी करण्यासाठी ब्ल्यु बर्ड इंटरनॅशनल स्कुलचे सांस्कृतिक विभागप्रमुख गिता चव्हाण, हलिमा अरब, मंजुरपाशा शेख, सौरभ वडे, फिरदोस सय्यद, तानाजी जाधव, सोहेल शेख, नाजमिन सय्यद, परमेश्वर चिलखे, सुप्रिया जाधव, रश्मी दुधनकर, पायल घायाळ, विनोद पांडुळे, अजय पाटील, मयुरी सुर्यवंशी, ज्योती मनगुळे, नितु भंडारी, वैष्णवी ढेकणे, यास्मिन फाजल, हबीब सय्यद, जेबा पठाण, अरबाज पठाण, दिपक खोजे, शरद साळुंके, महारूद्र जवादे, महम्मद मुलानी, सतिष निलंगेकर यांनी अथक परिश्रम घेतले.

# मनपाच्या वतीने डेंग्यू प्रतिबंध जनजागृती उपक्रम

लातूर/प्रतिनिधी :लातूर शहरातील रुग्णालयांमध्ये गेल्या काही दिवसांपासून संशयित डेंग्यू रुग्ण व डेंग्यू सदृश्य रुग्ण यांच्या संख्येमध्ये वाढ होत आहे. या रुग्णांच्या आकडेवारीचा विचार केला असता, असे लक्षात येते की - बहुतांश रुग्ण हे वय वीस वर्षाच्या आतील आहेत. सदरील रुग्ण शाळा, कॉलेजेस मधील शिक्षण घेणारे विद्यार्थी असल्यामुळे शहरातील शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन डेंग्यू विषयक प्रतिबंधात्मक जनजागृती करण्याचा उपक्रम लातूर मनपा आयुक्त श्री. बाबासाहेब मनोहरे आणि उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या सूचनेनुसार व मनपा आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्या मार्गदर्शनामध्ये शहरामध्ये राबविण्यात येत आहे.

त्याचाच भाग म्हणून आज श्री. केशवराज विद्यालय येथे महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कदम एस. बी. यांच्यासोबत डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र - इंडिया नगर यांच्या टीमसह भेट दिली. यावेळी शाळेच्या इमारतीत व कॅम्पस मध्ये कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. त्यानंतर डॉ. ऋषिकेश खरोळकर यांनी विद्यार्थ्यांना डेंग्यू आजारापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी काय उपाययोजना केल्या पाहिजेत ? डास उत्पत्तीची ठिकाणी ओळखून ती नष्ट करणे का महत्त्वाचे आहे, तसेच डेंग्यू आजाराची कारणे, आजार झाल्यानंतरची लक्षणे आणि वेळीच आजाराचे निदान आणि उपचार यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना सोप्या भाषेमध्ये समजावून सांगितले.

तसेच या डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांची आपली शाळा, आपले घर आणि आपल्या आसपासच्या परिसरामध्ये काळजी घेण्यासंदर्भात आवाहन केले. याप्रसंगी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरोग्य विभागाच्या वतीने विद्यालय व्यवस्थापणास डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे जनजागृतीचे पोस्टर आणि पोम्प्लेट देण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. संजय कुलकर्णी आणि उपमुख्याध्यापक श्री. महेश कस्तुरे यांनी सहकार्य केले.

# मुक्तांगण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी काढली आषाढीनिमित्त दिंडी



धाराशिव (प्रतिनिधी) – येथील मुक्तांगण प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचा विद्यार्थ्यांची दिंडी दि.१६ जुलै रोजी काढण्यात आली.

प्रारंभी बालरोगतज्ञ डॉ. मुसळे यांच्या आई-वडीलांच्या हस्ते विठ्ठल – रुक्मिणी व पालखीची पुजा करुन करण्यात आली. यावेळी शाळेच्या संस्थापिका कमलताई नलावडे यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी विविध संत, विठ्ठल रुक्मिणी व वारकरी यांच्या वेशभूषा करुन सर्वाचे लक्ष वेधले. तसेच विठ्ठल नामाच्या जयघोषात व नृत्य सादर करीत चिमुकल्यांनी पालखीची शोभा वाढविली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मुख्यमंत्र्यांशी शिष्टमंडळाच्या चर्चेनंतर धनगर युवकांचे बेमुदत उपोषण स्थगित

**लातूर / प्रतिनिधी-** विविध मागण्यांसाठी लातुरात सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत सकल धनगर समाज बांधवांच्या शिष्टमंडळासोबत बैठक झाली. येत्या आठ दिवसांत मंत्रालयात संबंधित उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतची माहिती पालकमंत्री गिरीश महाजन यांनी पत्राद्वारे देऊन उपोषण स्थगित करण्याचे आवाहन केले. पत्र प्राप्त झाल्यानंतर दोन्ही उपोषणकर्त्यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.बैठकीस विधान परिषदेच्या उपसभापती नीलम, गोऱ्हे, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार जयकुमार रावल, आमदार श्वेता महाले, साधना गवळी, गणेश हाके, देविदास काळे, बाळासाहेब किसवे आदी उपस्थित होते.



या बैठकीत सकल धनगर समाज बांधवांच्या मागण्या सादर केल्या. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर अनिल गोयेकर आणि चंद्रकांत हजारे यांनी आपले उपोषण मागे घेण्याचे आवाहन पालकमंत्र्यांनी केले. याबाबतचे पत्र प्राप्त झाल्यानंतर समाज बांधवांशी चर्चा करून दोन्ही उपोषणकर्त्यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. तसेच उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या उपस्थितीत उपोषण स्थगित केले.

# हासेगाव फार्मसीचे १२ विद्यार्थी जी पॅट परीक्षेत कॉलिफाईड

औसा / प्रतिनिधी- भारत सरकारच्या मानव विकास संसाधन मंत्रालयातर्फे फार्मसी च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेत औसा तालुक्यातील हासेगाव येथील श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था अंतर्गत लातूर कॉलेज फार्मसी हासेगाव महाविद्यालयाचे विध्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अखिल भारतीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी एम. फार्मसीचे शिक्षण घेत असताना इंडियन फार्मसी कौंसिल कडून दोन वर्षासाठी २९७६०० इतकी शिष्यवर्ती देण्यात येते . कु.माधुरी शिंदे २०३ गुण,शमशोद्दिन शेख १५६ गुण ,सबा शेख १५५ गुण,बोबडे ऋतुजा १४६ गुण,नितीन लाडगे १३६,उर्मिला राठोड १३५ गुण ,रोडे प्रीती ११० गुण , राहुल पाटील ७६ गुण , दीपाली बिराजदार ७६ गुण ,केदार मठपती ७५ गुण,योगेश तपसे ७१ गुण घेऊन तर तिगोटे आशिष ५१ घेऊन उत्तीर्ण झाले असून या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव करण्यात आला . या प्रसंगी श्री वेताळेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री भीमाशंकर अप्पा बावगे सचिव वेताळेश्वर बावगे यांच्या सह लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव महाविद्यालय, ज्ञानसागर विद्यालय हासेगांव, लातूर कॉलेज ऑफ डी फार्मसी लातूर, राजीव गांधी पॉलिटेक्निक कॉलेज हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ औधोगिक प्रशिक्षण संस्था हासेगाव, गुरुनाथ अप्पा बावगे इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ सायन्स लातूर चे प्राचार्य सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विध्यार्थ्यांचे अभिनंदन संदेश देऊन पुढील भविष्याच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**टी. सी. हरवली आहे.**
तनिष आनंद अगरवाल या नावाची आर एन मोठेगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय लातूर या कॉलेजची १२ वी पास ची टी सी गोलाई ते गांधी चौक प्रवासात हरवली आहे कुणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
**मोबा:-९८९०५८१८७८**

## जाहिर प्रगटन

क्र.२०२४/दंडणीय/कावी-६९
तहसिल कार्यालय धाराशिव.
दि. ०३/०४/२०२४

या नोटीसी द्वारे समस्त गावकरी कसबे तडवळा, ता. जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात कलीम सलिम शेख, कसबे तडवळा, यांनी त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे. जन्म झालेल्याचे नांव श्री. कलीम सलिम शेख, सदरील व्यक्तीचा कसबे तडवळा या ठिकाणी दिनांक १९/११/१९८५ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक १३/०३/२०२४ या रोजी अर्ज केला आहे. वरील जन्मबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतरच्या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**नायब तहसिलदार (मह)**
**तहसिल कार्यालय धाराशिव**


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४–६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३–३४ | | ६८–८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५–७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८–८६ | | ७२–२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय–अस्त | | सिंगल:९–५–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७–४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय–अस्त | | सिंगल:०–३–७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४–० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय–अस्त | | सिंगल:७–१–४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०–७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

# यशवंत

गुरुवार दि. १८ जुलै २०२४

## उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९१८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com





**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# आषाढी एकादशी निमित्त वांजरवाडा येथील गोविंद माऊली मंदीरात हजारो भाविकांनी घेतले दर्शन .. !





**जळकोट (माधव होनराव)** तालुक्यातील वांजरवाडा येथील प्रति पंढरपूर म्हणून समजले जाणारे व तीर्थ क्षेत्राचा दर्जा मिळालेले श्री संत गोविंद माऊली मंदीर येथे बुधवारी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

वांजरवाडा ता. जळकोट जि. लातूर येथील श्री संत गोविंद माऊली मंदीर देवस्थान आहे.भक्तांची श्रद्धा असलेले हे देवस्थान आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात श्री संत गोविंद माऊली व त्यांच्या सुविद्य पत्नी भीमादेवी यांच्या समाधीस्थळावर मूर्ती पाहावयास मिळते. पंढरपूरच्या विठ्ठलावरील निस्सिम भक्तीचे प्रतिक म्हणून त्यांच्या पाठीमागे विठ्ठल-रुक्मणी यांच्या पुर्णाकृती मूर्ती आहेत. त्यावर विविध देवदेवतांचे मूर्ती असलेले सुंदर असे शिखर आहे. बाहेर मोठा मंडप असून विविध धार्मिक कार्यक्रम वर्षभर चालतात.

माऊली मंदिराचे नेमके इ.स. उपलब्ध नसले तरी ते खुप जुने असल्याचे सांगितले जाते. येथे प्रतिवर्षी एप्रिल- मे महिन्यात चैत्र एकादशीला मोठी यात्रा भरते. काला - दहिहंडी साठी हजारो भाविक येत असतात. प्रति पंढरपूर असलेल्या या मंदीरात राज्यातील नांदेड, लातूरसह इतर राज्यातून व परराज्यातून भाविक दर्शनासाठी येतात. गोर गरीब शेतकरी कुटुंबातील भाविकांना पंढरपूर येथे जाणे शक्य नसल्याने ते येथे श्रध्देने येतात. बाहेरून आलेल्या भाविकांची मंदीर कमिटीच्या वतीने चहा फफराळाची सोय करण्यात आली होती.

**श्री संत गोविंद माऊली मंदिराला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात आला असून मंदीर विकासासाठी कॅबिनेट मंत्री ना. संजय बनसोडे यांनी दिड कोटीचा निधि उपलब्ध करून दिला आहे. लवकरच कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यांनी बुधवारी दर्शनासाठी आले असता सांगीतले. यावेळी मंदीर देवस्थान कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.**

**मंदिरासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल भाविकांनी व गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले आहेत.**

# प्रतिपंढरपूर डोंरशेळकीत भावीकांची अलोट गर्दी

## उपजिल्हाधीकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक महापुजा



**उदगीर (प्रतिनिधी)** मराठवाड्यातील प्रतिपंढरपूर म्हणून नावा रूपाला आलेले तीर्थक्षेत्र( ब) दर्जा प्राप्त श्री समर्थ धोंडूतात्या महाराज संस्थान डोंगरशेळकी ता.उदगीर येथे आषाढी एकादशीला भावीकांची अलोट गर्दी झाली होती.सकाळी ५:३० उदगीर उपजिल्हाधीकारी सुशांत शिंदे व सौ. स्वाती शिंदे (दाबाडे) उपजिल्हाधिकारी धर्माबाद यांच्या हस्ते सपत्नीक महापुजा करण्यात आली. तर आरतीचा मान आशोक पाटील या वारकरांना मिळाला ना.क्रिडा युवक कल्याण व बंदरे विकास मंत्री संजय बनसोड, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, तहसीलदार राम बोरगावकर यांनी दर्शन घेतले. मराठवाड्यासह शेजारी राज्य कर्नाटक,अंधप्रदेश, तेलंगणा येथुन ही भावीक मोठ्या प्रमाणात आले होते.अनेक भावीक पायी चालत मुखी हरी नाम घेत दिंडी घेऊन नागमोडी वळन रस्त्याने भगवंताचे आभंग गात येत होते. परीसरातुन आनेक दिंडी आले होते.श्री सर्मथाची पालखी नगर प्रदक्षीणा घालत गावच्या पश्चिम दिशेला गजेरपापा च्या भेटीला जाते.पालखी प्रस्थान मार्गावर गावातील महीला बघीनी रांगोळी टाकुन रस्ता सजवले होते.भावीकांची गर्दी लक्षात घेता मंदीर विश्वतांच्या वतिने दर्शन रांगेची वाढीव व्यवस्था ही करण्यात आली होती. सुलभ दर्शनाची ची व्यवस्था मंदीर विश्वतांच्या वतिने करण्यात आली होती. सकाळी रिमझिम पावसात ही भावीक भिजत दर्शन रागेत उभे होते.भावीकांची वाढती गर्दी लक्षात घेता उदगीर आगाराच्या वतिने जादा बसेस ची वाढीव व्यवस्था करण्यात आली होती.दर्शन रांगेत भावीकांची गैर सोय होवू नये यासाठी मंदीर च्या वतिने स्वंयसेवक मदतीला उभे केले होते. भावीकांसाठी मंदीराच्या वतिने मोफत फराळाची व्यवस्था केली होते.मंदिर परिसरात भावीकांन सोबत कुठलाही अनुचित प्रकार घडुनये यासाठी वाठवणा पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक भिम राव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# साकोळकर विद्यालयात मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते रनींग ट्रॅकचे भूमिपूजन

**उदगीर (प्रतिनिधी)** देवर्जन येथील गंगाधरराव साकोळकर पाटील मा.आणि उच्च मा.विद्यालयाचे मु.अ / प्राचार्य शिवराज भालके हे आपल्या प्रदीर्घ सेवेतून दि.३० जून २०२४ रोजी सेवा निव्रत झाले आहेत. त्यानिमित्याने संस्थेच्या आणी विद्यालयच्या वतीने दि. १८ जुलै २०२४ रोजी ठीक १०.०० वाजता प्राचार्य शिवराज भालके आणी प्रा. ऊी श्रीमती सुलभा साकोळकर यांचा भव्य सेवापुर्ती सोहळा आयोजित केला आहे.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे साहेब उपस्थित राहणार आहेत. याच कार्यक्रमा सोबत साकोळकर क्रीडा संकुलावरील २०० मी. चा Running Track चे उदघाटन होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव साकोळकर हे उपस्थित राहणार आहेत.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच अभिजित साकोळकर,संस्थे चे उपाध्यक्ष मनोज साकोळकर,संस्थे चे डायरेक्टर नारायणराव रोडगे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, क्रीडा अधिकारी जग्गनाथ लकडे , मुकदम , उमेश पाटील, मुन्ना पाटील, ॲड. पाटील उपस्थित राहणार आहेत. तरी देवर्जन पंचक्रोशीतील सर्व सरपंच, पोलीस पाटील,पालक सर्व शिक्षक आणी शिक्षकेत्तर कर्मचारी आणी विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. तरी सर्वानी या कार्यक्रमाला उपस्थित राहून स्नेह भोजनाचा लाभ घ्यावा.


**सस्नेह निमंत्रण**

स्वातंत्र्य सैनिक शिक्षण संस्था देवर्जन द्वारा संचलित...

**गंगाधरराव साकोळकर पाटील प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,देवर्जन**

श्री/सौ ____________

**शाळेच्या क्रीडांगणावरील २०० मि.चा धावणपथ (रनिंग ट्रॅक) चे भूमिपुजन व प्राचार्य श्री.भालके शिवराज भिमराव यांचा सेवापूर्ती सोहळा**

गुरूवार दि.१८/०७/२०२४ सकाळी ठिक १०.०० वा.

: शुभहस्ते :

**मा.ना.श्री.संजयजी बनसोडे**

मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, बंदरे महाराष्ट्र राज्य

: कार्यक्रमाचे अध्यक्ष :

**श्री.शिवाजीराव गंगाधरराव पाटील**

अध्यक्ष, स्वा.सै.शि.संस्था देवर्जन

: प्रमुख पाहुणे :

मा.श्री.सुशांत शिंदे (उपजिल्हाधिकारी,उदगीर)

मा.श्री.जगन्नाथ लकडे (जिल्हा क्रीडा अधिकारी,लातूर)

मा.श्री.राम बोरगावकर (तहसिलदार,उदगीर)

मा.श्री.प्रविण सुरडकर (गटविकासअधिकारी,उदगीर)

मा.श्री.ज्ञानेश्वर मुकदम पाटील (उपकार्यकारी अभियंता,लातूर)

मा.श्री.अरविंद पवार (पो.नि.ग्रामीण पो.ठाणे,उदगीर)

मा.श्री.उमेश पाटील (सचिव,भा.लि.एज्यू.सो.उदगीर)

मा.श्री.सिध्देश्वर (मुन्ना) पाटील (माजी सभापती कृ.उ.बा.स,उदगीर)

यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्याचे योजीले आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

: सत्कारमूर्ती :

**प्रा.डॉ.सौ.सुलभा ओ.साकोळकर पाटील व प्राचार्य/मु.अ. भालके शिवराज भिमराव**

: आपले विनीत :

प्रा.ओमप्रकाश जी.साकोळकर पाटील (सचिव,स्वा.सै.शि.संस्था देवर्जन)

अभिजीत चंद्रप्रकाश साकोळकर पाटील (सरपंच,ग्रा.पं.देवर्जन)

नारायण रामकृष्ण रोडगे (संचालक,स्वा.सै.शि.संस्था देवर्जन)

मनोज शिवाजीराव साकोळकर पाटील (उपाध्यक्ष,स्वा.सै.शि.संस्था देवर्जन)

शिरूरे बाबू मन्मथप्पा (प्राचार्य/मु.अ.गं.सा.पा.मा.व उ.मा.वि.देवर्जन)

लद्दे रंजना नागोराव (मुख्याध्यापिका,गं.सा.पा.प्रा.वि.देवर्जन)

कांबळे मोहन अर्जून (पर्यवेक्षक,गं.सा.पा.मा.व उ.मा.वि.देवर्जन)

कांबळे दिलीप पांडूरंग (पर्यवेक्षक,गं.सा.पा.उ.मा.वि.देवर्जन)

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व समस्त गावकरी देवर्जन

**स्थळ : गंगाधरराव साकोळकर पाटील विद्यालय देवर्जन ता.उदगीर जि.लातूर**


# आषाढी एकादशीनिमित्त बाळासाहेब पाटोदे मित्र मंडळाच्या वतीने फराळ वाटप



**उदगीर (प्रतिनिधी)** छत्रपती शिवाजी महाराज चौक, उदगीर येथे आषाढी एकादशी च्या निमित्ताने बाळासाहेब पाटोदे मित्र मंडळाच्या वतीने आज शाबुदाना खिचडी व केळी वाटप करण्यात आले ,यावेळी उदगीर जळकोट मतदार संघाचे भाग्यविधाते ,तथा महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संजयभाऊ बनसोडे साहेब उपस्थित होते ,यावेळी मित्र मंडळाच्या वतीने भाविक भक्त तसेच एकादशी च्या निमित्ताने गरजू व भाविकांना खिचडी शाबूदाणा वाटप करत असताना ,श्री.मनोज पुदाले श्री.बाळासाहेब पाटोदे,श्री. अभंग जाधव,श्री.सतीश पाटील मानकीकर ,श्री पत्रकार अशोकमामा कांबळे ,श्री .धीरज (बंटी)कसबे श्री अंकुश ताटपल्ले ,पंकज कालानी, राहुल अतनुरे सर , राजू घोरपडे ,विजय चिखले, विक्रम सूर्यवंशी,विकास बिरादार ,गणेश मुंडकर ,करण मोरे,ऋषिकेश पाटील ,अजित फफ़ुलारी ,अमोल पाटील ,अदनान जादूगार ,नारायण कोयले ,विजयकुमार बामणिकर ,ज्ञानेश्वर बिरादार ,पवन ढोबळे ,प्रतीक पाटील इ.उपस्थित होते .

# आषाढी एकादशीनिमित्त दुधिया हनुमान मंदिर येथे भाविकांची दर्शनासाठी अलोट गर्दी

## ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते वृक्षारोपण





**उदगीर (प्रतिनिधी)** आषाठी एकादशीनिमित्त दुधिया हनुमान मंदिर विठ्ठल रुक्मीणी मंदिरात भाविकांनी अलोट गर्दी केली होती. तर ना. संजय बनसोडे यांनी विठ्ठल रुक्मीणीचे दर्शन घेवून वृक्षारोपण केले.

आषाढी एकादशीनिमित्त उदगीर शहर व पारिसरातील विविध मंदिरात भाविकांनी पहाटेपासुनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. उदगीर येथील दुधिया हनुमान मंदिर येथे विठ्ठल रुक्मीणी मंदिरात पहाटे व्यंकटराव नागराळे विळेगावकर व ज्ञानेश्वर सावळे यांच्या हस्ते सपत्नीक अभिषेक व पुजा करण्यात आली. मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांना शबुदाना फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांनी पहाटेपासुनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. राज्याचे क्रिडा मंत्री ना. संजय बनसोडे यांनी विठ्ठल रुक्मीणीचे दर्शन घेवून मतदार संघात पिकपाणी भरपुर पडु दे व जनतेचे आरोग्य सदृढ रहावे यासाठी प्रार्थना केले. यावेळी ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते मंदिर परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसिलदार राम बोरगावकर, न.प.चे मुख्याधिकार सुंदर बोंदर, बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्वर पाटील, दुधिया हनुमान मंदिर संस्थानचे ओम विश्वनाथे, विकास तपसाळे, सिताराम भोसले, शरद पातेवार, सतिश उस्तुरे, उमाकांत गुडले, विजय राठोड, माधवराव पाटील, जनकराज जिवणे आदि उपस्थित होते.

दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना मंदिर संस्थानच्या वतीने व शहरातील भाविकांनी शाबुदाना, केळी चे वाटप करण्यात आले. समता नगर येथील विठ्ठल रुक्मीणी मंदिरा आषाढी एकादशीनिमित्त भजन संपन्न झाले. भाविकांनी दिवसभर दर्शनासाठी गर्दी केली होती. शेल्हाळ रोड येथे विठ्ठल रुक्मीणी मंदिरात दिवसभर भाविक भक्तांने दिवसभर रांगा लावल्या होत्या. शंकरलिंग मठात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. श्रीक्षेत्र हत्तीबेट येथे पंचक्रोशीतील महिला, पुरुष, अबाल, वृध्द दर्शनासाठी परिसर गजबजुन गेला होता. जळकोट रोड बोधन नगर येथील विठ्ठल रुक्मीणी मंदिरात महिला पुरुष भाविकांनी गर्दी केली होती. एमआयडीसी लोणी येथील विठ्ठल रुक्मीणी मंदिरात भजन किर्तन संपन्न झाले. या ठिकाणी भक्त मंडळींनी दिवसभर दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. एस.टी कॉलनी येथील विठ्ठल रुक्मीणी मंदिरात आषाढी एकादशी निमित्त चिमुकल्यांची व महिलांची वारकरी दिंडी संपन्न झाली. या विठ्ठल रुक्मीनी मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.